( पु.ल.आपल्या भेटीला )



# पुन्हा एकदा असा मी असामी

( भाग - एक )

डॉ. वीरेंद्र वसंत ताटके

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# पुन्हा एकदा

# असा मी असामी

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# पुन्हा एकदा

# असा मी असामी

- भाग एक

(पु.ल. आपल्या भेटीला)

## डॉ वीरेंद्र वसंत ताटके



पुन्हा एकदा असा मी असामी
लेखक- डॉ वीरेंद्र वसंत ताटके

पत्ता - ए - १०५, वनाज परिवार सोसायटी,
कोथरूड, पुणे, ४११०३८
मोबाईल क्रमांक - ९२२५५११६७४
मेल आयडी – tatakevv@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १४ मे २०२१(अक्षयतृतिया)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.


तुळशी वृंदावन ते कॅक्ट्स ते
स्मार्ट मोबाईल

# लेखकाचा परिचय



डॉ वीरेंद्र वसंत ताटके


(M.Com, MBA, PhD, FICWA, NISM)

डॉ वीरेंद्र वसंत ताटके हे कॉर्पोरेट क्षेत्रात आणि शिक्षण क्षेत्रात फायनान्स आणि कॉस्टिंग या विभागात गेली पंचवीस वर्षे कार्यरत आहेत.ते इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट अकौंटंट्स ऑफ इंडियाचे फेलो मेंबर असून फायनान्स विषयात त्यांनी पीएचडी संपादित केली आहे. गुंतवणूक विषयावर त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली असून आकाशवाणी, दूरदर्शनवर गुंतवणूक विषयावर त्यांच्या मुलाखती प्रसारित झाल्या आहेत. बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आणि असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स ऑफ इंडिया यांच्यातर्फे घेतल्या जाणाऱ्या गुंतवणूक कार्यशाळेचे ते ट्रेनर आहेत.याशिवाय ते वर्तमानपत्रांतून गेली अठरा वर्षे लेखन करत आहेत.सध्या ते पुण्यातील एका एमबीए महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत.

पु.ल.देशपांडे यांचे लिखाण हा त्यांच्या विशेष जिव्हाळयाचा विषय आहे. पुलंच्या हयातीत त्यांच्यासोबत पत्रव्यवहार करणे

आणि त्यानंतर पुलंच्या जन्मदिवशी आणि स्मृतिदिनादिवशी पुण्यातील त्यांच्या निवासस्थानाला भेट देणे यातून वीरेंद्र ताटके हे पुलंसोबत अप्रत्यक्षपणे हितगुज करत असतात.

## 'पुलं'कीत ठेवा


17/11/89

पु. ल. देशपांडे
१ रूपाली,
७७७ शिवाजीनगर
पुणे ४११००४

श्री वीरेन्द्र ताटके यांस स० न०

तुमचे पत्र मिळाले.
पत्रातून व्यक्त केलेल्या तुमच्या
स्नेहभावनेबद्दल आणि शुभेच्छांबद्दल
मनःपूर्वक धन्यवाद.

तुमचा
पु.ल. देशपांडे

# लेखकाचे मनोगत

तीस वर्षांपूर्वी पुलंचे ‘असा मी असामी’ पहिल्यांदा वाचले. तेव्हापासून त्यातील नायक अर्थात ‘धोंडोपंत’ हे रोजच्या जगण्यातील एक भाग झाले. दररोज असे अनेक धोंडोपंत आजूबाजूला दिसतात आणि आपल्या स्वतःमध्ये सुद्धा एक धोंडोपंत दडला आहे आणि तो पुलंच्या धोंडोपंतांसारखाच वागतो असा एक शोध मला लागला. धोंडोपंत आणि कुटुंबियांमुळे जगणं सुसह्य होतं, कटकटीतून दोन क्षण सुटका होते आणि मनातल्या मनात आपण हसतो याचेदेखील वेळोवेळी प्रत्यंतर आले. असे हे धोंडोपंत आजच्या जगात आले तर, काय धमाल होईल या विचारातून या पुस्तकाचा जन्म झाला.

‘पौष्टिक जीवन’ या लेखात पुलंनीच म्हणल्याप्रमाणे या पुस्तकातील मजकुराचे मालक पुलंच आहेत, मी फक्त पोस्टमन आहे. माझ्या कुवतीनुसार जे लिहिता आलं, ते व्यक्त करण्याचा हा प्रयत्न आहे. लेखनात झालेल्या चुकांसाठी पुलंची माफी मागून, सदर इ -बुक आपल्यासमोर ठेवत आहे. केवळ आणि केवळ पुलंविषयी वाटणाऱ्या प्रेमाखातर हे पुस्तक लिहले आहे.त्यातून कोणतेही उत्पन्न मिळवण्याचा हेतू नसल्याने हे पुस्तक विनामूल्य

देण्याचे ठरवले आहे. लिखाणातून कोणाचेही मन दुखविण्याचा हेतू नाहीए; परंतु नजरचुकीने तसे झाले असल्यास त्यांची आधीच माफी मागतो. वाचकांनी आपले अभिप्राय आणि सूचना ९२२५५११६७४या माझ्या मोबाइल क्रमांकावर फोन करून किंवा व्हाट्सअँप मेसेज करून अवश्य द्यावेत ही विनंती.

- डॉ वीरेंद्र वसंत ताटके

संपर्क

डॉ वीरेंद्र वसंत ताटके

पत्ता - ए - १०५, वनाज परिवार सोसायटी,

कोथरूड, पुणे, ४११०३८

मोबाईल क्रमांक - ९२२५५११६७४

मेल आयडी – tatakevv@yahoo.com

**निवेदन :-**

पुस्तकातील चित्रे मी स्वतः रेखाटली आहेत. ती चित्रे पाहताना पुलंच्या दामले मास्तरांच्या, “लेका, चित्रं काढली आहेस का X X X X X कागदावर?” या वाक्याची आठवण वाचकांना नक्की होईल.

- डॉ वीरेंद्र वसंत ताटके

|| एक पत्र पुलंना! ||

II श्री II

प्रिय भाई,

सा. न. वि.वि.

पत्रास कारण की...

‘जन्म आणि मृत्यू या दोन टोकांमध्ये पकडून नियतीने चालविलेल्या आपल्या साऱ्यांच्या फसवणूकीवर उपाय म्हणजे आपुलकीने हसवणूक करणे’ - असे मानणारे आपण आणि आपल्या मताशी शंभर टक्के सहमती असणारे आम्ही हे आपल्या मधील नातं! आपण आमच्यातून देहाने निघून गेलात तरी आजही आपली रोज गाठ पडते. पण आज आपल्याशी संवाद साधण्याची इच्छा झाली त्यामुळे हे पत्र लिहीत आहे.

खरं तर, काळाबरोबर नाती विरविरीत होतात असा अनेकांचा अनुभव, परंतु आपल्याशी असणारे हे नाते वर्षानुवर्षे अधिकच घट्ट

होत चालले आहे. याला कारण म्हणजे आजूबाजूला घडणाऱ्या क्लेशकारक घटनांमध्ये दिलासा देणारी आपली साहित्यनिर्मिती!

आपण सांगितल्याप्रमाणे मनाला त्रास देणाऱ्या घटनातून सुटका करून घ्यायची असेल तर आपल्यालाच वाट काढावी लागते. शेजाऱ्याने रेडिओ मोठ्या आवाजात लावला तर त्याचा त्रास करून न घेता आपल्यालाच रेडिओवरील गाणी ऐकू यावीत म्हणून त्याने रेडिओचा आवाज मोठा ठेवला आहे, अशी आपल्या मनाची समजूत करून घ्यावी असे आपणच सांगून ठेवले आहे. आम्हीदेखील तेच धोरण चालू ठेवलेलं आहे, त्यामुळे मनस्ताप कमी होतो. उदाहरण द्यायाचे झाले तर, 'ट्रॅफीक जाम' मुळे त्रास करून न घेता उलट त्यामुळेच रस्त्यावरील मॉडेल्सची (गाड्यांच्या!) माहिती आपल्याला होते अन् आपल्या ज्ञानात भर पडते असे आम्ही मानतो. शिवाय ट्रॅफीक सिग्नल्सच्या दिव्यांमुळे दिवाळीसारखी रोषणाई, ती देखील दिवसा उजेडी पहायाला मिळून मनोरंजन होते, अशीही धारणा आम्ही करून घेतली आहे. शिवाय चौकाचौकांमध्ये लटकवलेल्या फलकांवरील महान व्यक्ती आमच्याकडे बघत तोंडभर हसत असलेल्या पाहून देखील आम्ही स्वतःला भाग्यवान समजू लागलो आहोत.

थोडक्यात आमचं आपलं बर चाललं आहे, तरीही कायम वाटत रहातं की, तुम्ही निर्माण केलेल्या व्यक्ती (आणि वल्ली) आसपास असत्या तर अजूनही बहार आली असती. तुमचे ते रावसाहेब आज पाहिजे होते, आणि त्यांची ती फुल्याफुल्यांची भाषा पण पाहिजे होती. आजची परिस्थिती पाहून ते तुम्हाला "काय हे, पीएल्! सगळं गोंधळच झालंय की सगळीकडं, एकेकाच्या xxxxx लाथा मारायला पायजे बगा. आमच्या डोक्याला हा ताप देऊन तुम्ही निवान्त बसलात की वो... वर!" असं नक्कीच म्हटले असते.

रावसाहेबांच्या जोडीला 'पुराव्यानं शाबीत' करणारे हरीतात्यादेखील आज हवे होते. अर्थात हरीतात्यांना काहीही 'शाबीत' करणं अवघड गेलं असतं कारण कोणताही पुरावा हाती लागू न देण्याचं काम आजच्या लोकांनी नक्कीच केलं असतं.

त्या नारायणालादेखील पुन्हा पाठवून द्या खाली! तो गायब झाल्यापासून लग्नकार्यातला 'आपलेपणा' कमी झालाय बघा. सगळ्याच गोष्टी आता 'इव्हेन्ट' झाल्यात! तुम्ही भले म्हणता "प्रत्येक घरात एक नारायण असतो".पण सध्या एकही नारायण

मिळणे मुश्कील झाले आहे. म्हणूनच आमची तेवढी 'रिक्वेष्ट' ऐका आणि द्या धाडून त्या नारायणाला खाली!

भाई तुम्ही स्वतः प्राध्यापक होता एकेकाळी! आणि प्राध्यापक असूनही तुमची तुमच्या चितळे मास्तरांवर काय श्रद्धा होती! आजचे विद्यार्थी आणि प्राध्यापक दोघांनाही चितळे मास्तरांच्या शिकवणीची गरज आहे. कारण विद्यार्थी आणि मास्तर या दोघांची एकमेकांवरची आणि ह्या दोघांची शिक्षणपद्धतीवरची श्रद्धा उडण्याची अवस्था सगळीकडे दिसत आहे.

मास्तरांच्या आसपास सखाराम गटणे देखील असेल बघा. त्या सखारामला मास्तरांच्यासोबतच येऊ देत. त्याची ती शुद्ध आणि छापखाना मराठी बोलण्याची सवय गेली का? का अजुनही अधूनमधून 'प्रयास हा प्रतिभेचा प्राणवायू आहे.' सारखी वाक्ये भिरकावत असतो? इकडे तर लोकांना मराठीच बोलायची लाज वाटायला लागली आहे. मराठी माणूस मराठी लोकांसमोरच मराठीत बोलण्यात कमीपणा मानतो आहे.....असो.

सखारामचा अस्सल शुद्ध मराठी बोलण्याचा एक कार्यक्रम आम्ही आयोजीत करू आणि त्या कार्यक्रमाचं नियोजन करायला आमच्या मदतीला परोपकारी गंपू येतो का तेवढं बघा.

खरं सांगू का, सगळयाच व्यक्ती आणि वल्लींची आज आम्हाला गरज आहे. त्यांच्या जोडीला ‘असा मी असामी’ मधला कविता करणारा नानू सरंजामे, बढाया मारणारा आप्पा भिंगार्डे, शंकऱ्या, प्रोफेसर ठिगळे आले तर मोठीच मजा येईल. त्यांना सांगा की पुणेकर, मुंबईकर, आणि नागपूरकर एवढेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील लोक 'कर' जोडून ह्या सर्वांची वाट पहात आहेत.

ती सर्व मंडळी गेल्यापासून निखळ विनोद नाहीसा झालाय. विनोदाच्या नावाखाली सध्या जे काही होतंय त्याला तुमच्या रावसाहेबांच्याच शब्दात “अरे, जमत नाय तर उगाच उंटाच्या शेपटीच्या बुडख्याचा मुका कशाला घेतोयास!” म्हणावसं वाटतं.

अर्थात सगळाच अंधार आहे असा नव्हे. मधूनच वाऱ्याची झुळूक यावी तशी काही मंडळी त्या विनोदात जीव आणत आहेत. अर्थात ती मंडळीदेखील वर उल्लेख केलेल्या व्यक्तींकडे डोळे लावून बसली असतील. म्हणूनच पुन्हा एकदा आम्ही रिक्वेष्ट करतो त्यांना पाठवून द्या!

जरा कल्पना करा, आम्ही सगळे श्रोते सभागृहात बसलो आहोत, आजूबाजूला सगळया व्यक्ती आणि वल्लींदेखील आहेत. आणि पुढे तुम्ही हार्मोनियमवर ‘वरात’ मधील “उगीच का कांता”

आळवत आहात. नुसती कल्पना करूनच रोमांचीत व्हायला होतंय! म्हणूनच आम्ही म्हणतोय - ‘‘तेवढं मनावर घ्याच.’’

अहो, गप्पांच्या ओघात सांगायचंच राहून गेलं.भाई, आपले ते ‘असा मी असामी’ मधले धोंडोपंत भिकाजी कडमडेकर-जोशी परवा भेटले होते. अजूनही तसेच मिश्किल आहेत. त्यांनी त्यांचे अलीकडील अनुभव त्यांच्या टिपिकल स्टाईलमध्ये सांगून मजा आणली. त्यांचे अनुभव त्यांच्याच शब्दात या पुस्तकात शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. आपण तो गोड मानून घ्याल याची खात्री आहे.

कळावे

लोभ असावा ही विनंती.

आपल्या असंख्य चाहत्यांपैकी एक

वीरेंद्र वसंत ताटके



अनुक्रमणिका

१.कसा मी कळेना

२.धोंडोपंतांची ‘स्मार्ट’ होण्याची तयारी!

३ धोंडोपंतांची ‘स्मार्ट’ खरेदी

४.धोंडोपंतांच्या आयुष्यात ‘मॉल’ वादळ.

५.धोंडोपंत अँड फॅमिली @ मॉल.

६.तरुणाईशी संवाद!

७. एक नवीन शत्रुपक्ष.

८. न्यू ईअरची पार्टी!

*“आखख्या ऑफिसमध्ये मीच एकटा असा आहे की ज्याला कोणतीही महत्त्वकांक्षा नाहीए.”*

*(कसा मी कळेना)*



# १.कसा मी कळेना

कसा मी? कसा मी? कसा मी? कसा मी?... !

इतकी वर्षे झाली पण अजूनही या प्रश्नाचे उत्तर मला सापडले नाही. अवतीभवती एवढी प्रगती झाली, सुधारणा झाल्या पण माझ्या या प्रश्नाचे कोडे मला काही सुटत नाही. पूर्वी अवघड वाटायच्या गोष्टी आता सोप्या झाल्या आहेत हे मात्र खरं. आमच्या हिच्या मावशीचं पार्ल्यातलं घर शोधताना आमची काय तारांबळ झाली होती हे तुम्हाला माहितच आहे. त्यावेळी शंकर छोटा होता... परवाच मी त्याला तो प्रसंग रंगवून सांगायचा प्रयत्न केला तर त्याचा आणि शरयूचा विश्वासच बसेना. शंकर मला म्हणाला, "फादर, सरळ गुगल मॅप का नाही वापरलं त्यावेळी मावशीआज्जीचं घर हुडकायला? किती सिंपल होतं." आता त्यावेळी गुगल मॅप काय, साधा मोबाईल फोनसुद्धा नव्हता हे त्याला सांगूनही पटलं नाही. त्याचं आपलं एकच म्हणणं, 'फादर तुम्ही कोणतीही गोष्ट खूप लाइटली घेता, एकही नवीन गोष्ट शिकायला नको असते तुम्हाला' एका बाजूला त्याचे हे म्हणणं तर दुसऱ्या बाजूला हिचे मत म्हणजे 'किती सिरियसली घेता तुम्ही

प्रत्येक गोष्ट... जरा म्हणून हलकंफुलकं विचार करायला जमत नाही तुम्हाला.. जगातील प्रत्येक गोष्ट आपल्याला आलीच पाहिजे असा कसा काय हट्ट असतो तुमचा? अशानं कसं व्हायचं?'

शरयूची तक्रार वेगळीच. तिचं म्हणणं 'बाबा, तुमचं माझ्या स्टडीकडे लक्षच नसतं …... सारखं आपलं ऑफिसचं काम, काम आणि काम.आमच्या टिचरचा किती वेळेला मेसेज आला आहे, माझ्या स्कूल डायरीमधून तुमच्यासाठी! पण एकही 'पॅरेंट मीटिंग'ला तुम्ही आला नाहीत स्कूलमध्ये.' तिला वाटतं की मी कायम ऑफिसच्या कामात 'बिझी' असतो. याउलट, तिकडे ऑफिसमध्ये साहेब कायम माझ्या नावाने शंख करत असतो - ऑफिसात अजिबात लक्ष नाही म्हणून.

एका बाजूला सोसायटीचा चेअरमन म्हणतो की, 'तुम्ही सोसायटीच्या कामात अजिबात सहभागी होत नाही' तर दुसऱ्या बाजूला सोसायटीचा वॉचमन म्हणतो की, 'साब सोसायटीके सबसे जादा काम आप ही करते है, आपके जैसा भला आदमी सारी सोसायटीमें नही है' दोघांपैकी खरं कोणाचं हे कळतच नाही. वॉचमन दर महिन्याला माझ्याकडून वेगवेगळी कारणे सांगून पन्नास-शंभर रुपये घेत असतो म्हणून मला मस्का लावतो असं म्हणावं तर सोसायटीच्या सेक्रेटरी सुद्धा मला थांबवून सांगतो, " टू

बी ऑनेस्ट, यु डिझर्व दी चेअरमन्स चेअर!" या मतमतांच्या गलबल्यात मी नक्की काम करतो आहे की नाही हेच मला कळत नाही.

'कसा मी कळेना' हा मला न सुटलेला प्रश्न आहे. त्याचप्रमाणे आजूबाजूचे लोकही नक्की कसे हे मला कळत नाही.आमच्या ऑफिसमधील लोकांचंच घ्या. आमचा आप्पा भिंगार्डे... साहेबाने काँप्युटरवर काम करायला सांगितलं तर म्हणतो, " मला कॉम्प्युटर सुरु सुद्धा करता येत नाही"... आणि त्याच्या घरी एकदा गेलो होतो तर घरात लॅपटॉप उघडून बसला होता! आता यातला खरा आप्पा कोणता?

केशरचं सुद्धा तसंच. ऑफिसात येताना चेहरा एवढा वाईट करून येते की जणू काही हिच्या घरी काही दुःखद प्रसंग घडलाय... पण कायकिणी सांगत होते, की रोज तिच्या व्हाट्सएपच्या स्टेटसला मात्र हसरे फोटो टाकत असते!

आमच्या ऑफिसातील आणखी एक गोष्ट जी मला नेहमी चक्रावून टाकते ती म्हणजे प्रत्येकाला आपण चुकीच्या ठिकाणी काम करतोय असं वाटतं. अगदी ऑफिसबॉय बाळूपासून ते अगदी आमच्या सायबापर्यंत प्रत्येकाला असंच वाटतं. त्या आमच्या

बाळूला काहीही काम सांगा, तो कायम पाय ओढत काम करतो. त्याच्याशी संवाद पुढीलप्रमाणे असतो -

"बाळू" - आवाजात शक्य तेवढी मार्दवता आणत मी हाक मारतो.

स्टुलावर बसून कानात मोबाईलच्या वायर खुपसून गाणी ऐकत बसलेल्या बाळूला ही हाक ऐकू जातच नाही.

"बाळू... " मी खुर्चीतून उठत त्याच्याजवळ आवाज चढवत जातो आणि समाधीतून त्याला जागृत अवस्थेत आणायचा प्रयत्न करतो.

"का... य?" कानातील नळ्या काढत अत्यंत त्रासिक आवाजात बाळू विचारतो.

"अरे, जरा पाणी देतोस का मला?" - मी पुन्हा विनवणीच्या स्वरात!!

"साहेब... तुमच्या चेअरपासून माझ्यापर्यंत जेवढा 'डिस्टन्स' आहे ना त्यापेक्षा कमी डिस्टन्सवर कुलर आहे. मी माझ्या खुर्चीतून उठून कुलरपर्यंत जाऊन तुम्हाला पाण्याची बॉटल भरून द्यायला जेवढा वेळ लागेल त्याच्या फक्त तीन चतुर्थांश वेळेत तुम्ही ते काम करू शकाल. तुम्ही विनाकारण तुमची आणि माजी एनर्जी वाया

घालवताय" काळ- काम-वेग च्या भाषेत मला बाळू समजावून सांगतो.

" अरे वा, एवढं जर तुमचं गणित चांगले आहे तर तुम्ही इथे काय करताय?" मी वैतागलेल्या स्वरात म्हणतो.

"तेच तर सांगतोय तुम्हाला सायेब, नशिबाचे फेरे... नायतर तुमच्यासारख्यांची चाकरी करायची वेळ आली असती का?... आपलं कॅल्क्युलेशन एकदम सुपरफास्ट होतं... खरं तर मी बँकेतच मोठ्या पोस्टवर लागणार होतो पण लकने दगा दिला."

आता फक्त 'लक'ने दगा दिल्यामुळे बँकेत मोठ्या हुद्द्यावर काम करू शकणाऱ्या या गणिततत्ज्ज्ञाला आपण पाण्याची बाटली भरून देण्यासारखे क्षुल्लक काम कसे काय सांगू शकतो या विचाराने माझीच मला लाज वाटू लागते आणि माझी मीच पाण्याची बाटली भरून घ्यायला निघतो तेवढ्यात बाळू म्हणतो, "सायेब, तुमच्या बॉटलबरोबर माझ्याही बॉटलमध्ये पाणी भरून द्याल का, प्लिज?"

आमच्या ऑफिस रिसेप्शनिस्ट अलू बोगाचा समज असा आहे की, तिची जागा खरं तर हिंदी चित्रपट सृष्टीतच आहे पण

नाईलाज म्हणून ती आमच्या ऑफिसमध्ये वेळ ढकलत आहे. त्यामुळे तिला ‘एखादा फोन लावून दे’ असे सांगण्यापूर्वी हजारदा विचार करावा लागतो. बाहेरचा एखादा फोन आला तर तो मला जोडून देताना फक्त “ इकडं बोला” असं बजावून दाणकन फोन आदळते जणू काही तो फोन आला आहे ही माझीच चुकी आहे.

ऑफिसमधला चहा देणाऱ्या पोऱ्याची गावाकडे बक्कळ शेती आहे पण तिथे " पाण्याचा ‘वाईच’ प्रॉब्लेम हाये " त्यामुळे इथे सध्या ‘टेम्परवारी’ चहाची टपरी चालवतो. त्याला चहा मागताना सुद्धा दहा वेळा विचार करावा लागतो.

आमच्या ऑफिसातील हेडक्लार्कला संगीतात करियर करायचे होते. आपल्या संगीत -गायनाची हौस तो ऑफिसात भागवून घेतो. शिवाय त्याच्याकडे काम घेऊन जाणाऱ्या प्रत्येकाला तो ‘ज्याला संगीत कळते त्यालाच आयुष्य जगायचा अधिकार आहे’ हे वाक्य प्रत्येकवेळी ऐकवतो त्यामुळे माझ्यासारख्याना आयुष्य जगण्याचा काहीही अधिकार नाही हे दिवसातून किमान दोन-तीन वेळा तरी माझ्या लक्षात येते.

हेडऑफिसमधून आठवडा -पंधरा दिवसातून एकदा आमच्या ऑफिसला व्हिझिटसाठी येणाऱ्या साहेबाला बॉक्सिंगमध्ये करियर करायचे होते... पण वडिलांच्या हट्टाखातर तो आमच्या ऑफिसमध्ये थोड्या कालावधीसाठी तीस वर्षांपूर्वी नोकरीला लागला. 'मी फक्त सहा महिने जॉब करणार' अशा बोलीवर हा पठ्ठ्या गेली तीस वर्षे आमच्या ऑफिसात चिकटून आहे... पण रोज रडत असतो की या जॉबमध्ये दम नाही... !!!

थोडक्यात आख्ख्या ऑफिसमध्ये मीच एकटा असा आहे की ज्याला दुसरी कोणतीही महत्त्वकांक्षा नाहीए.

ऑफिसमध्ये ही तऱ्हा तर सोसायटीत सुद्धा फार वेगळी स्थिती नाहीए. 'दिवसभराच्या कामातून अज्जीबात वेळ मिळत नाही' असं म्हणणाऱ्या बायका फोनवर तासनतास चॅटिंग करताना पाहून मी चाट पडतो. सोसायटीच्या व्हाट्सअँप ग्रुपवर रोज सकाळीसकाळी प्रेमाचे संदेश पाठवणारे समोर आले की बोलत नाहीत. खरं तर माझ्याकडे तो स्मार्ट फोन नव्हताच, पण नाईलाज झाला त्यामुळे खरेदी करावा लागला. त्यामागील कथा आणि व्यथा पुढे नक्की वाचा.

* * * * * * * * * * * * * * * * * * *

*“ शंकऱ्या विविध मोबाईल कंपन्यांच्या जाहिराती मला उत्साहाने दाखवत होता. मला मात्र त्या मोबाईलच्या ठिकाणी वीस हजार, पंचवीस हजार, तीस हजार अशा किंमती दिसत होत्या.”*

*(धोंडोपंतांची ‘स्मार्ट’ होण्याची तयारी !)*



## २.धोंडोपंतांची ‘स्मार्ट’ होण्याची तयारी !

मुळात आयुष्यात स्मार्ट मोबाईल फोन घेईन असं बापजन्मी मला वाटलं नव्हतं. पहिल्यांदा स्मार्ट मोबाईल घेऊन ऑफिसात गेलो तो दिवस अजून आठवतोय मला! …... “कोण धोंडोपंत?” हा प्रश्न ऑफिसातल्या प्रत्येकाने विचारला होता. बऱ्याच वर्षांपूर्वी मी ऑफिसात प्रथमच सूट घालून गेलो होतो तेव्हा सुद्धा प्रत्येकाने हाच प्रश्न विचारला होता. पण हळूहळू त्या सुटची अंगाला सवय झाली आणि मी एकदाचा 'सूट'लो होतो … त्यानंतर पुन्हा एकदा बऱ्याच वर्षांनी या स्मार्टफोनमुळे ‘स्मार्ट’ बनायची आफत आली होती.

आमची बेनसन जानसन कंपनी ही अँड मंगळदास झाली आणि साहेबाने नवनवीन फतवे काढायला सुरुवात केली... त्यापैकीच हा एक फतवा होता... त्याचं झालं असं की, आमच्या या नवीन ऑफिसात अल बोगा नावाच्या नव्याने आलेल्या रिसेप्शनिस्टने मंगळदास शेठच्या सोयीसाठी फोनचा कसलातरी ग्रुप केला... एके दिवशी तिने मला तिच्या नाजूक आवाजात विचारले, “सर, येणार ना तुम्ही आमच्या ग्रुपमध्ये.”... तिच्या ‘मी

करू का तुम्हाला ऍड' अशा लाडिक हट्टामुळे माझ्या छातीच्या ठोक्यांची लय वाढली. आपल्या हातून भलतंसलतं होऊ नये म्हणून तिला काही उत्तर न देता सटकलो... दुपारी आप्पा प्रधानाच्या डब्यातील थालपीठ खाताना त्याच्या कानात सकाळची भानगड कुजबुजून टाकली... त्यावर आप्पा फुsss करून हसला आणि म्हणाला, "धोंडोपंत, यू आर ए फुल. ती व्हाट्सअप ग्रुपविषयी बोलत असेल. मी झालोय ऍड कालच त्या ग्रुपमध्ये. तू सुद्धा घेऊन टाक एक स्मार्ट मोबाईल."

आप्पाचं बरोबर होतं ........ खुद्द मंगळदासशेठनी 'आय वान्ट माई ऑफिस टू भी अप टू ढेट' असे फर्मान काढले काढले होते ... त्यामुळे स्मार्ट होण्याशिवाय आम्हाला पर्याय नव्हता ... खरं तर आत्ता नवीन मोबाईल घेणं परवडणार नव्हतं पण पर्याय नव्हता.

आप्पा मला म्हणालाच, "आपण काय, वझ्याचे बैल ! साहेब म्हणाला घ्या स्मार्ट मोबाईल - आपण लगेच घ्यायचा स्मार्ट फोन... उद्या म्हणाला घरातला लँडलाईन फोन अडकवून या पॅन्टला -

आपण यायचं तसं!” आणि आप्पा येईलसुद्धा तसा! त्याच्या रक्तातच ते आहे.

मिस अल बोगाचा हा ग्रुप मला भलताच महाग पडणार होता हे माझ्या हळूहळू लक्षात येऊ लागले …संध्याकाळी शंकऱ्याला चौपाटीवर ‘भेळ आणि शहाळे’ या बोलीवर घेऊन गेलो… तिथे त्याने माझा वर्गच घेतला. स्मार्ट फोन म्हणजे काय, … त्यातला कोणता फोन सध्या 'कडक' आहे, … डेटापॅक कसा ‘मारायचा’…, व्हाट्सअँप कसे ‘चालवायचे’…, त्यावरून मेसेज कसे फॉरवर्ड करायचे हे सर्व त्यानं मला समजावून सांगितले! मधेमधे ‘कळतंय ना तुम्हाला फादर..’ असं समजावणी -कम-दटावणीच्या सुरात विचारत होता... रोज घरी आईचं बोलणं ऐकत असतो ना!!

माझ्यासाठी हे सर्व नवीन होते. मी मनात विचार करू लागलो की कबुतराच्या मार्फत निरोप पाठविणारे आपण काळाच्या ओघात कुठपर्यंत येऊन पोहचलो. आम्ही शाळेत असताना वर्गात नापास झालेल्या पोराचा निकाल वर्गातील पोरं त्याच्या घरी बोंबलत सांगायला जाईपर्यंत पोचत नव्हता आणि इथे शंकऱ्या सांगत होता की, त्याच्या टिचरने (सरोज खरे, आपली हं) मोबाईलवर कसला ग्रुप केलाय त्यावर सगळ्यांचे मार्क्स पालकांना घरी

बसल्याबसल्या लगेच कळतात म्हणे!!!... बरं झालं, आमच्या काळात हे नव्हतं, नाहीतर आम्ही परीक्षेत उधळलेले गुण बघून आम्ही घरी पोचायच्या आधीच आमच्या तीर्थरुपांनी आमच्या स्वागताची आणि उत्तरपूजेची तयारी केली असती.

माझी तंद्री शंकऱ्याच्या किंचाळण्याने भंग पावली.

शंकऱ्या जोरात ओरडून म्हणाला, “तिकडे बघा फादर …काय कडक मॉडेल आहे.”

शंकऱ्याच्या इशाऱ्याकडे मी पहिले तर एक तंग कपडे घातलेली तरुणी तिच्या मोबाईलमध्ये डोके खुपसून बसली होती. शंकऱ्याचा आणि आपला काही संबंध नाही असा अविर्भाव चेहऱ्यावर आणत मी दुसरीकडे बघायला लागलो. शंकऱ्या पुन्हा माझ्या कोटाची बाही ओढत ओरडला, “ फादर, बघा ना ते मॉडेल”

मी कावराबावरा होऊन पुटपुटलो, " अरे गाढवा, मॉडेल काय म्हणतोस... "

माझ्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत शंकऱ्या त्या तरुणीकडे पळत गेला आणि तिच्याशी इंग्रजीत काहीतरी बोलायला लागला.

माझे मात्र हाय आणि लो असे दोन्ही ब्लडप्रेशर एकदम सुरु झाले आणि मनातल्या मनात मी कडमड्याच्या रामाच्या देवळात

कीर्तन करणाऱ्या आमच्या काकाच्या आवडीचे ‘ सदगुरूवाचून सापडेना सोय... धरावे ते पाय..’ हे पद डोळे घट्ट मिटून मनातल्या मनात मोठ्याने म्हणू लागलो!

पाच-सात मिनिटात शंकऱ्या धावत आला आणि म्हणाला, "चला फादर, मिळाले सगळे डिटेल्स मोबाईलच्या मॉडेलचे"

मला हायसं वाटलं आणि हसत हसत त्याला म्हणलं, "अरे तू फोनचं मॉडेल म्हणत होतास होय? "

भाबडेपणाने शंकऱ्या म्हणाला, " हो ssss ! तुम्हाला कोणत्या मॉडेल विषयी वाटले? "...... शंकर त्याच्या निरागसता कि काय म्हणतात, त्यानं आजही काळजाला कधी हात घालील ते सांगता येत नाही.

शंकऱ्याच्या प्रश्नाचे उत्तर टाळण्यासाठी मी त्यालाच प्रश्न विचारला, " तुला अजून एक भेळ हवी का? "

“नको, त्यापेक्षा एसपीडीपी कडक असते” शंकर उत्साहाने म्हणाला.

आता मात्र ' कडक' म्हणजे काय याचा अर्थ मला माहित होता ........ शंकऱ्याने एसपीडीपी खाताखाता मला त्या फोनच्या मॉडेलविषयी माहिती दिली ......... शिवाय ती तरुणी त्याच्या कॉलेजात शिकणारी ‘मिस राधा’ होती हा खुलासा त्याने पुरीचा

तोबरा तोंडात भरता भरता केला आणि शंकऱ्याचे सिनियर तिला ‘राधा ही बावरी’ असं चिडवतात अशी मौलिक माहिती सुद्धा द्यायला तो विसरला नाही …….. हातातल्या कागदी पत्रावळीतील पुऱ्या खाताखाता शंकऱ्या गाणं म्हणू लागला ……... " राधा ही बा sss वरी, हरीची राधा ही बावरी” ….. आवाज काही अगदीच वाईट नाही कारट्याचा - असा विचार माझ्या मनात येऊन गेला.

त्यानंतर शंकऱ्याने स्मार्टफोनविषयी अजूनही खूप ज्ञानामृत दिले…….. सर्वात महत्त्वाचे म्हणजे असा मोबाईल साधारणतः पंचवीस ते तीस हजारांना पडतो हे त्याने सांगितले!!!

रिक्षाने घरी येताना वाटेत दिसणाऱ्या विविध मोबाईल कंपन्यांच्या जाहिराती शंकऱ्या मला उत्साहाने दाखवत होता... मला मात्र त्या मोबाईलच्या ठिकाणी वीस हजार, पंचवीस हजार, तीस हजार अशा किंमती दिसत होत्या.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

*“मला खरं तर त्या स्मार्टफोनची आवड नाहीये आणि त्यावरील फेसबुक सारख्या प्रकरणांची तर अजिबातच आवड नाहीए...आपल्या पैशानी दुसऱ्याची सुख-दुःख बघायचा धंदा सांगितलाय कोणी?”*

*(धोंडोपंतांची ‘स्मार्ट’ खरेदी)*



# ३. धोंडोपंतांची ‘स्मार्ट’ खरेदी

आमची सोसायटी ही अशी एक अचाट वस्ती आहे की, जिथे कोणत्याही क्षुल्लक गोष्टीची घटना होते... मी स्मार्टफोन मोबाईल घेणार याची जाहिरात मोबाईल कंपनीच्या जाहिरातींपेक्षा अधिक झाली ....जो तो " काय धोंडोपंत, स्मार्ट फोन घेणार म्हणे तुम्ही? " असं विचारायला लागला ... जणू काय मी मुलाबाळांसह एखाद्या बुडालेल्या कंपनीच्या मालकासारखा पळून जाणार होतो.

मला खरं तर त्या स्मार्टफोनची आवड नाहीये आणि त्या स्मार्टफोनवरील फेसबुक सारख्या प्रकरणांची तर अजिबातच आवड नाहीए...आपल्या पैशानी दुसऱ्याची सुख-दुःख बघायचा धंदा सांगितलाय कोणी?

आमच्या घरात या स्मार्ट फोनचं खुळ बऱ्याच दिवसापूर्वी आलं होतं. आमची कन्या शरयू तिच्या आईला एकदा म्हणाली होती, " आपले बाबा बावळट आहेत ना ग आई! त्या मिनीचे पप्पा बघ कसं स्मार्टफोनवर सारखं काहीतरी बघत असतात."…. त्यावर एखाद्या स्वाभिमानी आईने पोरीच्या तोंडात ठेवून दिली असती...

पण आमची ही कन्येची समजून काढत म्हणाली, " अगं घेत नाहीत तेच बरं आहे... शोभला पाहिजे ना स्माssss र्ट फोन! "

त्याच्यानंतर एकदा तो ठिगळया (प्रो. ठिगळे) घरी आला होता माझ्या बुशकोटाची मापं घ्यायला!! .... तेव्हा शंकऱ्याचा आक्रोश सुरु होता “बाबा मला फोन .....एफ ओ एन... फोन”

त्यावर ठिगळया त्याला म्हणाला “मास्टर शंकर, एफ ओ एन नाही... एफ ओ एन इ असं स्पेलिंग आहे फोनचं”

माझ्याकडे बघत ठिगळया म्हणाला, "हल्लीच्या मुलांचं इंग्लिश अगदी लूज आहे ना... आपल्यावेळी इंग्लिश कसं टाईट होतं ना! पण मी काय म्हणतो, साहेब तुम्ही घ्याच एक स्मार्ट फोन"

मी त्यावर काही बोललो नाही. मनातल्या मनात बाबांना आठवले. बाबा म्हणाले, " बेंबट्या, चार माणसे वागतात तसे वागावे. कोर्टात भांडण आणि तीर्थात मुंडन करायला लाजू नये. घेऊन टाक स्मार्ट फोन!! "

बाबांना स्मरून स्मार्टफोन घ्यायचा मनाचा हिय्या केला.

मन घट्ट करून एके रविवारी सहकुटुंब स्मार्ट मोबाईल खरेदीसाठी बाहेर पडायचे ठरवले. तुम्हाला माहीतच आहे की मी हे सहकुटुंब सहपरिवार बाहेर जाण्याचे प्रसंग शक्य तितके टाळतो ........ एकतर रस्त्यावर गाड्यांची भयानक गर्दी. तरी शंकऱ्या

आता थोडा मोठा झालाय त्यामुळे तो मला रस्ता क्रॉस करायला मदत करतो.

एवढा सगळा कुटुंबकबिला घेऊन जायचं म्हणजे टॅक्सी पाहिजे....आता यावेळेला कुठे टॅक्सी मिळणार असा माझ्या मनात आलेला विचार ओळखून शंकऱ्या म्हणाला, " 'ओला' बोलावू का फादर? "

"शंकऱ्या, आता ओलाबीला झालास तर थोतरीत ठेवून देईन..." मी वैतागून म्हणालो.

एकतर आमचा गोतावळा असा रस्त्याच्या कडेला उभा असलेला बघून सोसायटील्या लोकांना फुकटात फॅमिली ड्रामा बघायला मिळाला होता, त्यात शंकऱ्या पुन्हा ओला होणार म्हणजे अवघड होतं.

तेवढ्यात शंकऱ्याची मैत्रीण निमा तिच्या आईबरोबर तिथे आली.

" फादर बोलावू का ओला?" पुन्हा शंकऱ्या किंचाळला.

" अहो तो 'ओला बोलावू का' असं म्हणतोय " समजुतीच्या स्वरात ही म्हणाली.

"मला कळतंय ते" मी थोड्या चढ्या आवाजातच उत्तर दिलं. परक्यांच्या समोर लावायचा एक आवाज मी नवरा म्हणून अजूनही राखून ठेवला आहे.

खरं तर मला 'ओला' प्रकरण काय आहे हे अजिबात कळलं नव्हतं पण निमा आणि तिच्या आईपुढे तमाशा नको म्हणून मी मानेनेच शंकऱ्याला 'कर तुला हवं ते' असा शरणागतीचा इशारा दिला.

शंकऱ्याने तत्परतेने निमीच्या मोबाईलवरून काहीतरी खाडखूड करून गाडी मागवली. निमा सुद्धा त्याला टॅक्सीचे पैसे 'मीच पे करते' असे म्हणाली .... पाच मिनिटात टॅक्सी आली .... मी अभिमानाने शंकऱ्याकडे पाहिले आणि टॅक्सीत बसलो.

मोबाईलच्या दुकानात पोचलो तर तिथे दरवाजात स्वागत करायला द्वारपाल हजर! ....त्याने अदबीने मोठ्ठा काचेचा दरवाजा उघडून आम्हाला आत येण्याची विनंती केली .... आत जाता जाता मी त्याला म्हणलं, " सावकाश लाव रे बाबा. काचेचा आहे... फुटला तर पंचाईत होईल.".... मागं एकदा गोठोस्कर दादांच्या घरी खिडकीचे दार जोरात ओढून लावताना त्याची काच माझ्या हातून फुटली होती. पण गोठोस्कर दादा देव माणूस. एका शब्दाने बोलला

नाही ….. नाही म्हणायला गोठोस्कर काकूंनी नंतर चहाचा कप माझ्यापुढे जरा जोरात आदळला होता पण मी त्याकडे दुर्लक्ष केले होते.

मोबाईलचे दुकान चांगले प्रशस्त होते … एका वेळी दोनशे पानांची पंगत सहज बसेल एवढा मोठा हॉल होता …... पण दुकानात शिरल्याशिरल्या मला अचानक थंडी वाजून आली …. मी हिला म्हणलं देखील, "जरा बघ गं अंगात ताप भरलाय का माझ्या, दुकानात आल्याआल्या एकदम थंडी वाजून आलीय."

शंकऱ्याने मला परस्पर उत्तर दिले, " फादर एकतर हे दुकान नाहीये, शॉपी आहे… आणि दुसरं म्हणजे ही जी थंडी आहे ना, तो एसीचा इफेक्ट आहे."

" अरे, तो एसी जरा बंद करायला सांग ना." मी कुडकुडत म्हणलं.

एवढ्यात समोरून चहाचा ट्रे घेऊन एक मुलगा आला …इथे येणाऱ्या प्रत्येक कस्टमरला चहा फुकट असतो, या शंकऱ्याने दिलेल्या माहितीला स्मरून मी दोन कप चहा मारला तेव्हा अंगातली थंडी कमी होऊन थोडी तरतरी आली आणि मी इकडेतिकडे नजर टाकली.

दुकानाच्या स्वागत कक्षात भिंतीवर मोठमोठे टीव्ही लावले होते आणि प्रत्येक टीव्हीवर वेगवेगळे कार्यक्रम सुरु होते. त्यापैकी एक टीव्ही तर पूर्ण भिंत भरून होता. आजूबाजूला भिंतीवरून पडदे सोडले होते. सगळीकडे अत्तराचा मंद सुगंध पसरला होता … त्या मोठ्या टीव्हीवर कसलातरी गाण्याचा कार्यक्रम सुरु होता. आयुष्यात प्रथमच मी एवढा मोठा टीव्ही पहात होतो ….आमच्या घरातल्या टीव्हीवर हत्ती सुद्धा उंदराएवढा छोटा दिसतो ……. त्यात प्रत्येकाला आपल्या आवडीचा कार्यक्रम बघायचा असतो त्यामुळे पोरांचे अगदी रणकंदन सुरु असते … आणि इथे प्रत्येक टीव्हीवर वेगवेगळा कार्यक्रम!! …. जरा कुठेतरी टेकून कार्यक्रम पहावेत म्हणून आजूबाजूला पाहिले तर शेजारीच कोचावर एक तरुणी आणि तिची धाकटी बहीण वाटेल अशी तिची आई बसल्या होत्या ……एवढ्या थंडीत दोघीही आखूड कपडे घालून बसल्या होत्या….. त्यांच्या पायाशी एक कुत्रं मोठ्या रुबाबात बसलं होतं. मी हळूच त्याच्याकडे पाहिलं... त्यानं मात्र मेलेल्या कुत्र्याकडे आपण पाहतो तसं माझ्याकडे पाहिलं आणि मान टाकली!!

माझ्याकडे बघून ती तरुणी म्हणाली, " प्लिज ह्याव अ सीट जंटलमन ! "

मला ‘जंटलमन’ म्हणणे म्हणजे कायकिणी गोपाळरावला अध्यात्मिक गुरु म्हणण्यासारखे होते … मागं एकदा आमच्या हिला कोणीतरी ‘मिसेस’ म्हणल्यामुळे ती लाजली होती तसा मी सुद्धा थोडा लाजलो आणि तिथेच थोडा टेकलो …कडमड्यांच्या इतिहासात एवढ्या मोठ्या घरातील दोन स्त्रिया आणि त्यांच्या कुत्र्यासोबत कोचावर बसलेला मी पहिलाच पुरुष होतो!

एवढ्यात शंकऱ्या धावतपळत मला शोधत आला आणि, "इथं काय करताय फादर, तिकडे चला मोबाईल सेक्शनमध्ये." असं म्हणत मला अक्षरशः ओढतच तिकडे घेऊन गेला. तिथे एक सूटबूट घातलेला मनुष्य गिऱ्हाईकांना मोबाईलची माहिती देत होता.

माझा नंबर आल्यावर त्याने मला विचारले, " व्हॉट टाईप ऑफ मोबाईल डू यू वॉन्ट सर? "

‘"नो टाईप … छे छे.. ओन्ली मोबाईल वान्ट " मी गडबडून उत्तर दिले.

माझ्या इंग्रजीने झोपलेल्या कुत्र्याच्या अंगावर गार पाणी टाकल्यावर ते जसं दचकून उठतं तसं माझ्या शेजारच्या कस्टमरने माझ्याकडे पाहिलं ……. पण मी त्याच्याकडे साफ दुर्लक्ष केलं!

" काका, कसला मोबाईल हवा आहे आपल्याला? " त्या सूटबूटवाल्याने मराठीत सुरुवात केली.

" चांगला! " मी ताड्कन उत्तर दिलं.

"आमच्याकडे फक्त चांगलेच मोबाईल मिळतात." सूटबूटवाला बहुतेक पुण्याचा असावा. "तरी पण मेमरी किती हवी?"

" भरपूर " - मी सुद्धा काही कमी नव्हतो.

" ओके ... ओके ...पण ॲडिशनल फीचर्स काय हवेत?" त्याने गडबडून विचारले.

" पिक्चर्स नको. फक्त मोबाईल पाहिजे !! " मी पुन्हा एकदा स्पष्ट उत्तर दिले.

माझ्या उत्तराने त्या सुटबूटवाल्याने त्याच्या कपाळावरील घाम पुसून मदतीसाठी आजूबाजूला बघितले.

दुकानात एसी का लावला होता याचे कारण मला आत्ता कळले.

एवढ्यात शंकऱ्या त्याच्या मदतीला आला आणि त्याने अगम्य शब्दात त्याला काहीतरी सांगितले. ते ऐकताना सूटबूटवाला अधूनमधून माझ्याकडे बघत होता.

शेवटी एकदा शंकऱ्याच्या दृष्टीने मला योग्य असे दोनतीन स्मार्टफोन शंकऱ्याने निवडले आणि माझ्यापुढे ठेवत मला तो म्हणाला “ फादर, यापैकी एक फायनल करा.”

" किंमती काय आहेत यांच्या …? " मी बाबांना स्मरून प्रश्न विचारला.

" हा ट्वेन्टीफाईव्ह थाउजंड…….. हा ट्वेन्टी सेव्हन थाउजंड आणि……… हा थर्टी थाउजंड. " शंकऱ्याने तत्परतेने उत्तर दिले.

मी खिसे चाचपू लागलो तेवढ्यात ही म्हणाली, “थर्टी वाला द्या. एकदाच अशी मोठी खरेदी होते आयुष्यात!! उगाच दोन -चार हजाराकडे बघायला नको.”

आता घाम पुसायची वेळ माझी होती.

गुपचूपपणे मी खिशातून नोटा काढल्या. शंकऱ्याने लगेच त्यात नवीन कार्ड टाकले आणि तो नवीन नंबर एकदोन दिवसात सुरु होईल अशी मौलिक माहिती मला दिली.

निघताना त्या सुटबूटवाल्याने माझे दोन्ही हात त्याच्या हातात घेऊन अशा पद्धतीने मला अभिनंदन म्हणले की मला हुंदकाच आला!!

येताना रस्त्यात शंकऱ्या सांगत होता, “फादर, मस्तपैकी गेम्स डाउनलोड करूयात मोबाईलवर.”


त्यावर उत्साहाने ही म्हणाली, “हो हो शंकऱ्या …. आमच्या क्लबात बायकांचा एक ग्रुप आहे व्हाट्सअँपचा …. हा नवीन मोबाइलनंबर त्यात ऍड करायला सांगते!! “

आज तो नवीन मोबाईल घरात येऊन तीन आठवडे झाले …. शरयू, शंकऱ्या, उल्हास आणि आमची ही यांच्या ताब्यात तो नवीन मोबाईल असतो …. नवीन मोबाईल प्रमाणेच घरातील सर्वच स्मार्ट झालेत... आणि मी मात्र अजूनही माझा जुनाच फोन घेऊन ऑफिसात जातो.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

*" इश्श, वाण-सामान काय म्हणताय? कित्ती गावंढळ वाटतंय!... ग्रोसरी म्हणा ना!"- ही तोंडाला पदर लावत म्हणाली.*

*(धोंडोपंतांच्या आयुष्यात 'मॉल' वादळ.)*



## ४. धोंडोपंतांच्या आयुष्यात ‘मॉल’ वादळ.

आमच्या घरात स्मार्टफोन नावाचं संकट आलं आणि त्यातून सावरतोय तोपर्यंत कोणतीही चाहूल नसताना आणखी एक वादळ अचानक येऊन थडकलं. त्याचं झालं असं, एके दिवशी नानू अचानक संध्याकाळी आमच्या घरी आला. जांभळी पॅंट, लाल रंगाच्या मोठ्या फुलांची नक्षी असलेला बुश-शर्ट, डोळयाला गॉगल आणि डोक्यावर विचित्र टोपी घातलेली, त्याचा अवतार बघितला आणि तेव्हाच ही जगबुडी आली असे मी मनातल्या मनात भाकीत केले ….. त्याचा हा अवतार कमी की काय म्हणून त्याने घरात शिरल्या-शिरल्या ‘बम्बई से आया मेरा दोस्त, दोस्त को सलाम करो’ असं टिपेच्या स्वरात गाणं सुरु केलं… आमची कार्टी पण लगेच त्याच्या बाजूने फेर धरून त्याला गाण्यात साथ देऊ लागली… या नानूचं मला आश्चर्य वाटतं, हा आमच्या घरात कधीही येवो…. आमच्या घरातली आणि आजूबाजूची तीन चार पोरं त्याच्या मागंमागं पळत येतात!… आम्ही ऑफिसातून घरी येताना सोसायटीच्या जिन्यात मोबाईलमध्ये डोकं खुपसून बसलेली

पोरं तोंड देखील वर न काढता अगदी अनिच्छेने बापाची इस्टेट दिल्यासारखी वर यायला वाट करून देतात.

आज पण तसंच झालं …….. नानू आला आणि पोरंटोरं हातातली वह्यापुस्तकं सोडून त्याच्यामागं पळायला लागली …. त्या पोरांच्या घोळक्यातून वाट काढत नानू माझ्याकडे आला आणि माझे खांदे गदागदा हलवत म्हणाला, "अभिनंदन धोंडोपंत …!"

मी ऑफिसातून नुकताच आलो होतो आणि चहा घेऊन शंकऱ्याचा इंग्रजीचा थोडा अभ्यास घेत होतो. त्याची स्पेलिंग खूप कच्ची होती म्हणून त्याच्याकडून थोडं पाठांतर करून घेत होतो….. तेवढ्यात याची स्वारी टपकली होती.

मी नानूकडे न पाहता म्हणालो, " काय म्हणतोस नानू?"

" अ - भि -नं -द- न " नानूने अक्षरांची फोड करून मला ओरडून पुन्हा सांगितले.

" काय म्हणालास? " मी मुद्दामहून पुन्हा विचारले.

" माय फ्रेंड, कान्ग्रॅच्युलेशन्स - के ओ एन जे आर इ... " नानू स्पेलिंगची जुळवाजुळव करत सांगायला लागला.

" पुरे पुरे नानू …..कळलं मला ", मी नानूचं स्पेलिंग अर्धवट तोडत म्हणलं.

नानूचं इंग्रजी आणि शंकरचं इंग्रजी ह्यात फारसा फरक नाहीये.

मुळात मला त्यानं माझे खांदे असे पकडून गदागदा हलवणं मला अजिबात आवडलं नव्हतं. त्याला असं अंगाशी लगट करायची सवयच आहे. मागे एकदा ऑफिसात प्रमोशन मिळालं म्हणून खुशीत येऊन मला उचलण्याचाच त्याने प्रयत्न केला होता... आता तो केवढा, मी केवढा... ...बसला होता नंतर आठवडाभर घरी पाठीत उसण भरली म्हणून!

" बोल नानू, कशाबद्दल अभिनंदन करत आहेस माझे? "

" धोंडोपंत, यू आर लकी.......!" नानूची इंग्रजीची हौस भागली नव्हती.

" नानू, सरळसरळ स्वच्छ मराठीत सांगतोस का कृपा करून!" मी वैतागून म्हणलं.

" सांगतो, सांगतो... तुमच्या भागात नवीन मॉल सुरु झाला आहे... आणि ही त्याची डिस्काउंट कुपन" लहान मुलांपुढे लॉलीपॉप नाचवावा तसे माझ्यापुढे रंगीत कागदाचे चिटोरे नाचवत नानू म्हणाला.

" काय सुरु झाला? " मी शांतपणे विचारले.

" मॉल!!" नानू

" मॉल?? " मी

" हो हो, मॉल!! " नानू मला गोल फिरवत म्हणाला.

त्याचा हा अवतार बघून घरात जमा झालेली कार्टी आमच्या भवती फेर धरून नाचत म्हणायला लागली "आम्ही मॉलला जाणार... आम्ही मॉलला जाणार ".

हाऽऽहा म्हणता ही बातमी आमच्या सोसायटीत पसरली. अर्थातच ही बातमी पसरविण्यात पुढाकार होता शंकर आणि शरयूचा! प्रत्येक फ्लॅटमध्ये जाऊन हळदीकुंकवाचे आमंत्रण दिल्यासारखे या दोघांनीही मॉलच्या आगमनाची आणि नानूकाकांनी डिस्काउंट कुपन आणल्याची वार्ता संपूर्ण सोसायटीत पोहचवली. अर्थातच यामुळे नानू हिरो ठरला आणि त्याचे सोसायटीतील वजन वाढले. याची पुढची पायरी म्हणजे मिळालेल्या डिस्काउंट कूपनचा विनियोग करण्यासाठी मॉलला भेट देण्याचे नियोजन करणे. या आघाडीवरदेखील शंकर, शरयू आणि आमची ही या तिघांनी जोरदार कामगिरी केली. पार्किंगमध्ये कोपरा सभा झाल्या, चर्चासत्रे झाली, वेगवेगळ्या पर्यायांची चर्चा झाली आणि प्रत्येकजण मॉलमध्ये जाण्याचे नियोजन करायला लागला.

त्यानंतर शंकऱ्याने आणि त्याच्या आईने माझे बौद्धिक घेऊन मॉलमध्ये खरेदी करण्याचे फायदे काय असतात हे मला समजावून सांगायचा प्रयत्न केला.

" अहो, असं काय करताय? एकाच ठिकाणी सगळ्यांची सगळी खरेदी करूयात.त्यांची ऑफर सुद्धा सुरु आहे.शिवाय नानू भाउजीनी कुपन दिली आहेतच डिस्काउंटची." ही आनंदाने फक्त उड्या मारायची बाकी होती.

" अगं, ते काय फुकट मिळणार आहे का सगळं?..एक तर अजून या महिन्याचं वाण-सामान भरलं नाही अजून " मी काळजीच्या स्वरात म्हणालो.

"इश्श, वाण-सामान काय म्हणताय? कित्ती गावंढळ वाटतंय!... ग्रोसरी म्हणा ना" ही तोंडाला पदर लावत म्हणाली.

" ग्रोसरी म्हणलं तर काय फुकट देणार आहेत का ते वाण सामान? " मी चिडून म्हणलो.

एवढ्यात शरयू धावतधावत येत म्हणाली, " बाबा बाबा, सगळ्यांचे ठरले आहे, येत्या रविवारी मॉलला जायचे!"

" ठरले आहे म्हणजे? कोणी ठरवले आहे " - मी आश्चर्याने विचारले.

" आम्हीच ठरवले" शरयूने छातीवर हात ठेवत आणि डोळे मोठ्ठे करत सांगितले.

" अरे, पण मला नाही का विचारायचे?" मी लटक्या रागाने विचारले.

" आईला म्हणले होते मी की बाबांना विचारुयात का म्हणून - तर आई म्हणाली -त्यांना काय विचारायचं, विचारले तर – ‘जाऊयात’- असं थोडंच म्हणणार आहेत ते!!! " शरयूने प्रांजळपणे खरे सांगून टाकले.

तिच्या या उत्तराने मी निरुत्तर झालो आणि मी विषय बदलला.

" अरे, चला, चला, आपल्याला मॉलमधून खरेदीची यादी तयार करायला हवी " मी उसने अवसान आणत म्हणालो.

" आमची यादी कध्धीच तयार झाली आहे बाबा " शरयूने माझ्या भोवती गोल गोल पळत पळत टाळ्या वाजवत म्हणलं.


तिच्या गोल गोल फिरण्याने मलाच घेरी आल्यासारखं झालं आणि मी खुर्चीत बसलो.

या शरयू मॅडम म्हणजे आमच्या घरातील शेंडेफळ... त्यांचा शब्द खाली पाडायची कोणाचीच हिम्मत होत नाही घरात. त्यामुळे रविवारी सहकुटुंब मॉलला भेट देण्याशिवाय माझ्यापुढे दुसरा पर्याय नव्हता.

* * * * * * * * * * * * * * * * * * * *

*“माझ्या चेहऱ्यावर भीती होती ती मॉलमधील खरेदीसाठी माझ्या खिशातील पैसे पुरे पडतील की नाही याची!”*

*(धोंडोपंत अँड फॅमिली @ मॉल)*



# ५.धोंडोपंत अँड फॅमिली @ मॉल.

आम्ही खरेदीसाठी मॉलमध्ये जाणार असे जाहीर केले होते तो रविवार शेवटी एकदा आला. अर्थात त्याआधी आमच्या सोसायटीत हलकल्लोळ माजला होता. नानूने डिस्काउंट खरेदीची कुपन आम्हाला आणून दिली आणि त्यावर लोक तुटून पडले. काही उत्साही मंडळींनी प्रोफेसर ठीगळेंकडून नवीन कपडे सुद्धा शिवून घेण्याचा विचार केला. ("आमचे येथे सर्व प्रकारचे कपडे शिवून किंवा आल्टर करून मिळतील “, प्रो ठिगळे). मात्र त्यापेक्षा मॉलमध्येच नवीन कपडे खरेदी करावेत असा काहींनी प्रतिवाद केला. त्यावर " पण एवढ्या मोठ्या ठिकाणी जायचे तर अंगात चांगले कपडे नकोत का?" हा प्रश्न काहीजणांनी उपस्थित केला. त्यावर प्रो. ठीगळेंकडे बरेच कपडे शिवायला आलेले असतात, त्यातील काही कपडे एक दिवसासाठी आपल्याला मिळावेत असा प्रस्ताव काहीजणांनी ठिगळेपुढे मांडला आणि विशेष म्हणजे ठिगळेनी तो स्वीकारला देखील! अनेक उत्साही मंडळींनी ठीगळेच्या या 'स्कीम' चा फायदा घेतला. त्यामुळे मॉलला जाताना सोसायटीततील बहुतेक लोकांच्या अंगावर ठिगळेच्या टेलरिंग

दुकानातील नवीन कपडे होते. त्या कपड्यांचा खरा मालक अचानक पुढे दत्त म्हणून उभा राहिला तर काय करायचे ही भीती त्यांच्या मनात होती. काही लोक मॉलमध्ये प्रथमच चालले होते. तिथे सरकते जिने असतात आणि त्यावर पहिले पाऊल टाकताना तारांबळ होते हे त्यांनी ऐकले होते त्यामुळे तसे पाऊल टाकण्याचा सराव ते काही दिवस करत होते. मॉलला जाताना सुद्धा रस्त्यात त्यांचा तसे पाऊल टाकण्याचा सराव सुरु होता. त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरसुद्धा भीती स्पष्ट दिसत होती. मॉलमधील लोक इंग्रजीत बोलतात असे कळल्यामुळे वस्तूंच्या किमतीची घासाघीस कशी करायची या चिंतेने काहीजणांच्या चेहऱ्यावर भीती होती. थोडक्यात प्रत्येकजण स्वतःच्या चेहऱ्यावर कसलीतरी भीती बाळगून होता. माझ्या चेहऱ्यावर भीती होती ती मॉलमधील खरेदीसाठी माझ्या खिशातील पैसे पुरे पडतील की नाही याची!!

मॉल आमच्या सोसायटीपासून चालत जाण्याच्या अंतरावर असल्याने आम्ही सर्वांनी एकत्र चालत जाण्याचे ठरवले. एवढे सगळे लोक एकदम आल्याने मॉलच्या वॉचमॅनने मॉलचे मोठ्ठे दार पूर्ण उघडले.

मी नेहमीप्रमाणे सोबत चपला ठेवण्यासाठी पिशवी ठेवली होती. मॉलच्या दरवाजात पोह्चल्याबरोबर मी चपला पिशवीत

ठेवल्या आणि वॉचमनला विनम्रपणे म्हणालो " इथे हरवतील म्हणून चपला आत नेतो" तर वॉचमन गुरकावला, " अंदर कुछ भी गन्दी चीज लेके जाना मना है ".

मी गपचूपपणे तिथल्या चप्पलस्टॅण्डवर चपला ठेवल्या. दरवाजातून आत शिरताशिरता मी हळूच त्या वॉचमनच्या शर्टच्या खिशावर लावलेल्या पितळी पट्टीवर त्याचे नाव वाचले... चक्क मराठी आडनाव होते... तो मराठी आणि मीही मराठी! मग मघाशी कशाला हिंदीत बोलला माझ्याबरोबर! असो..

आत प्रवेश केला तर आचंबित झालो. सर्वत्र लाईटच्या दिव्यांचा एवढा लखलखाट होता की डोळे दिपून गेले. खाली पांढरीशुभ्र फरशी होती ज्यामध्ये त्या दिव्यांचे प्रतिबिंब पडल्याने संपूर्ण मॉल उजळून निघाला होता. आमच्या शंकऱ्याची मुंज झाली होती त्या हॉलच्या कितीतरी पट मोठा हॉल होता हा! भिंतीवर ठिकठिकाणी मोठमोठ्या तसबिरी लावल्या होत्या, …… पण त्या तसबिरीमधील चित्रे नक्की कशाची होती हे कळले नाही... आमच्या घरात देखील आमची कन्या शरयूने भिंतीवर असाच शिसपेन्सिलने गिरगोटा केला होता आणि त्यात भर म्हणून शंकरने तेलखडूने कधीही न पुसल्या जाणाऱ्या करामती करून ठेवल्या होत्या … असो... 'नको त्या तेलकट आणि मळकट आठवणी'

असे मनाशी म्हणत मी सर्वत्र नजर फिरवली. मॉलमध्ये ठिकठिकाणी मांडलेल्या वस्तू दाखविण्यासाठी चेहऱ्यावर कमालीची नम्रता थापलेली मुले आणि मुली उभी होती.

आमच्या भांबावलेल्या चेहेऱ्यांकडे पाहून विक्रेत्या मुलींपैकी एक पुढे आली आणि तिने कमरेत थोडसं वाकून आम्हाला हसून नमस्कार केला. थोड्या वेळापूर्वी वॉचमन सोबत झालेल्या चर्चेच्या अनुभवामुळे मी हिंदीत सुरुवात केली, " यहा पे किराणा माल का सामान कोठे मिलेंगा? "

माझं हिंदी ऐकून तिने मराठीत सुरुवात केली, " भाऊ, इथे तीन मजले आहेत. पहिल्या मजल्यावर कपडे मिळतात, दुसऱ्या मजल्यावर गिफ्ट आर्टिकल मिळतात आणि तिसऱ्या मजल्यावर हाऊसहोल्ड मटेरियल आणि किराणा माल मिळेल. "

" म्हणजे तीन मजले आहेत? " मी जवळजवळ किंचाळलोच.

उत्तरादाखल तिने फक्त स्मितहास्य केले.

त्यानंतर क्षणार्धात आमची गर्दी एखाद्या जत्रेत हरवून जावी तशी पांगली.

मी आपला तळमजल्यावर चक्कर मारावी म्हणून फिरू लागलो तर पुढे ऑफिसातील मंडळी हजर!! नानूच्या डिस्काउंट कूपनचे लोण तिकडेसुद्धा पोहचले होते. आप्पा भिंगार्डे, केशर

मडगावकर, कायकिणी गोपाळराव या तिघांसोबत स्वतः नानू सरंजामे आला होता. नानूने नेहमीप्रमाणेच चित्रविचित्र पोशाख केला होता आणि त्याच्या डोळयाला गॉगल होता .... उन्हात ठीक आहे पण इथे थंड वातावरणात कशाला गॉगल घालायचा?... मागं माझे डोळे आले होते तेव्हाच फक्त मी ऑफिसात गॉगल घालून बसायचो. साधं वॉशरूमला जाताना सुद्धा चाचपडत जायला लागायचं त्या गॉगलमुळे.......नानू मात्र सराईतपणे वावरत होता आणि जणू काही तो या मॉलचा गाईड आहे अशा अविर्भावात सर्वांना प्रत्येक पॉईंटची माहिती देत होता.

‘ऑफिसातील मंडळींसोबत मॉलमध्ये थोडं फिरतो ‘ - असं मी मानेनेच हिला आणि शंकरला सांगितले आणि नानूमागे चालू लागलो. कायकिणी गोपाळराव प्रत्येक काउंटरपुढील विक्रेत्याने नमस्कार केला की त्याला कमरेत वाकून नमस्कार करत होता. कायकिणी मुळातच एकदम मऊ माणूस. हाफिसातसुद्धा चपराशाला सुद्धा दोन्ही हातांनी वाकून नमस्कार करतो.... आप्पा भिंगार्डे मात्र त्याच्या आधीच्या सात पिढ्या आणि त्याची आठवी पिढी इथे नेहमी येतात अशा दिमाखात चालत होता. केशरने संपूर्ण पांढरा ड्रेस परिधान करून पुन्हा एकदा पांढऱ्या व्हाइट्टपणाची कमाल केली होती.

खरं तर पहिल्या मजल्यावर हिंडतानाच माझी दमछाक झाली. एकतर हातात ती प्लॅस्टिकची बास्केट घेऊन चालायचे म्हणजे अवघड जात होतं. नानू मात्र सराईतपणे त्याच्या बास्केटमध्ये एकेक वस्तू टाकत होता. कायकिणीने तिथे सुद्धा त्यांच्या गुरुदेवांच्या इंग्रजी पुस्तकाची आवृत्ती पुस्तकविक्रीच्या काउंटरवर हुडकून काढली आणि त्यात डोके खुपसले होते ..... केशर सौंदर्यप्रसाधनांच्या काउंटरकडे पळाली होती.... आप्पा भिंगार्डेने मात्र त्याची बास्केट पूर्ण भरली होती. मी त्याच्या कानात कुजबुजलो सुद्धा, "आप्पा, एवढी सगळी खरेदी करणार आहेस तू?"

त्यावर आप्पाने मोठ्या आवाजात उत्तर दिले, " काही नाही रे, थोड्या वेळाने पुन्हा त्या त्या ठिकाणी ठेवून टाकणार आहे वस्तू!"

आता यात कसला आलाय शहाणपणा... पण आप्पाचं लॉजिकच वेगळं. मी त्याला प्रत्युत्तर न देता मुकाटपणे त्याच्याबरोबर हिंडू लागलो.

एवढ्यात आप्पाला दुसऱ्या मजल्यावर जाणारा सरकता जिना दिसला. मला ओढत ओढत तो तिकडे घेऊन गेला आणि लहान मुलाचा हात धरून जसे पाऊल टाकायला शिकवतात तसे माझे

पहिले पाऊल त्या सरकत्या जिन्यावर टाकायला मदत केली. एका मिनिटात आम्ही दुसऱ्या मजल्यावर आलो.

इथे आमच्या सोसायटी मधील बरीच मंडळी होती. बहुतेकांच्या हातातील प्लास्टिक बास्केटा वेगवेगळया वस्तूंनी भरल्या होत्या. त्या गर्दीत मी एकटाच असा होतो की ज्याच्या हातातील बास्केट रिकामी होती. पट्टेवाला कुत्रा बिनपट्टेवाल्या कुत्र्याकडे बघतो तसे प्रत्येकजण माझ्याकडे बघत होता. मी बाबांचे स्मरण केले. बाबा सांगायचे की, ‘इतर लोक वागतात तसे वागावे’ ........बाबांना स्मरून मी मॉलमधील खरेदीचा श्रीगणेशा करायचा ठरवला. पुस्तकाच्या काउंटरवर जाऊन ' श्यामची आई ' आहे का विचारले तर त्याने माझ्याकडे पुन्हा एकदा पट्टेवाल्या कुत्र्याने बिनपट्टेवाल्या कुत्र्याकडे पहावे तसे माझ्याकडे पहिले ... मी काय ते समजून घेतले आणि दोनचार मोठ्या आकाराच्या वस्तू बास्केटमध्ये टाकून दिमाखात चालू लागलो.... एवढ्यात आमचा कुटुंबकबिला समोरून येताना दिसला. माझ्या हातातील वस्तुंनी भरलेली बास्केट भरून हिने माझ्याकडे अभिमानाने पाहिले. शंकऱ्या लांबूनच माझ्या दिशेने पायातले शूज घासत वेगाने आला आणि माझ्या पुढ्यात येऊन किंचाळला, " ओ माय गॉड, फादर, एवढी खरेदी केलीत तुम्ही!! "

नेमकं त्याचवेळी माझ्या शेजारून हिच्या क्लबातील जोगळेकर बाईंचे यजमान हातात रिकामी बास्केट घेऊन चालले होते. आता मी त्यांच्याकडे प. वाल्या कु.ने बीनप. वाल्या कु.कडे पहावे तसे पाहिले. तो बिचारा ओशाळला.

मी चटकन हिला म्हणालो “चला आपल्याला वाणसामान खरेदी करायची आहे ना? तिसऱ्या मजल्यावर चला.” आप्पाचा सल्ला आठवत मी बास्केटमधील वस्तू पुन्हा जागच्याजागी ठेवून तिसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी सरकत्या जिन्याकडे सरकलो.

तिसऱ्या मजल्यावर सुसज्ज असा किराणा मालाचे काउंटर होते.

तिथे आम्ही हवे असलेले वाणसामान खरेदी केले आणि बिल करायच्या काउंटरकडे निघालो. आम्ही खरेदी केलेले सामान आणि माझ्या खिशातील पैसे यांचा मेळ बसत नव्हता …काउंटरवरील माणूस सज्जन होता, त्याला सुद्धा घरी कुटुंब असलेच ना... त्याने बिचाऱ्याने माझी मनस्थिती आणि परिस्थिती ओळखली आणि बास्केटमधील काही वस्तू काढून ठेवायला सांगितल्या …. आमची ही जड मनाने एकेक वस्तू काढून ठेवू लागली …शंकर आणि शरयू तिला मदत करत होते... शंकरसाठी


घेतलेलं नवीन शुज, शरयूसाठी घेतलेला ड्रेस, हिच्या मेकअपचे साहित्य अशा एकेक वस्तू ते तिघे बाहेर ठेवत होते …

शरयूने एक बॉक्स हिच्याकडे देत म्हणलं, “हे बॉक्स घेतलंच पाहिजे आई... यात बाबांसाठी नवीन बनियन आहेत. बाबांचे घरातील बनियन खूप फाटले आहेत.” आता आमच्याकडे उरलेल्या वस्तूंचे बिल किती झाले हे त्या डिजिटल बोर्डवर उमटले पण ते मला स्पष्ट दिसले नाही कारण माझ्या चष्म्याच्या आत अश्रू जमा झाले होते.

* * * * * * * * * * * * * * * * * *

*“ एकविसावे शतक एकविसाव्या वर्षात पदार्पण करत असताना तुम्हाला पुन्हा एकदा तरुण झाल्यासारखं वाटत नाही का?” - तरुणी*

*(तरुणाईशी संवाद)*



## ६. तरुणाईशी संवाद!

नवीन वर्षातील अशीच एक सकाळ. व्हाट्सअँपवर आलेल्या शुभेच्छा मेसेजचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करत होतो. पूर्वी फक्त सणासुदीला लोकांचे शुभेच्छा मेसेज यायचे. म्हणजे नवीन वर्ष, दसरा, दिवाळी आणि फार तर गणपती, नवरात्र अशा सणांना लोक एकमेकांना शुभेच्छा द्यायचे. आता तसं काही राहिलं नाही. ‘एकादशीच्या शुभेच्छा’ असा मेसेज मला पहिल्यांदा आला तेव्हा मी थोडा दचकलो होतो. तीच तऱ्हा चतुर्थीच्या दिवशी. पण आता सवय झाली आहे ....अगदी ‘शुभ सोमवार’, ‘शुभ मंगळवार’ अशा प्रत्येक वारांच्या मेसेजची सुद्धा सवय झाली आहे.सर्वात कहर म्हणजे मला बैल पोळयाला सुद्धा शुभेच्छांचा मेसेज आला होता. शुभेच्छा देताना यमक जुळवून बुचकळयात टाकणाऱ्या नवकवींची पैदास हा तर वेगळाच त्रासाचा विषय आहे... असो.

व्हाट्सअँपवर पाठवलेल्या कविता समजून घेण्यात सकाळचे चार तास गेले. त्या शिणवट्यातून बाहेर येत असताना ओढवलेला हा प्रसंग आहे. रामराया जन्मला ती टळटळीत दुपारची वेळ. हवेत विचित्र उकाडा परंतु आत मात्र थंडी वाटत असण्याचा काळ. जेवण

होऊन थोडं आडवं पडावं असा विचार करत होतो तेवढ्यात दारावरील बेल वाजली. त्रासिक होऊन दार उघडले तर दारात दोन तरुण मुले आणि दोन तरुणी उभे होते. मी थोडं वैतागून विचारलं " काय पाहिजे?"

त्यावर त्यापैकी एक तरुणी नाटकात पाठ केलेले सवांद बोलत विंगेतून रंगमंचावर एखादे पात्र येते तशी मला अक्षरशः ढकलत दिवाणखान्यात येत म्हणाली, " आम्ही महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या प्रांताचे प्रतिनिधित्व (उच्चारी "पती-निधित्व") करणारे तरुण आहोत.आम्हाला नववर्षाविषयी आणि तरुणाईविषयी वयस्कर लेखकांच्या प्रतिक्रिया समजून घ्यायच्या आहेत म्हणून तुमची मुलाखत घेण्यासाठी आम्ही आलो आहोत. आम्ही तरुण लेखक आहोत."

तिचा 'वयस्कर' हा शब्द खटकला परंतु " आपले स्वागत आहे" असे म्हणण्याशिवाय मला पर्याय नव्हता. मुळात मी लेखक कधी झालो हे मला कळले नाही, त्यामुळे ' कोण पाहिजे तुम्हाला?' असा प्रश्नही ओठांवर आला होता. पण तेवढ्यात लक्षात आले की, गेल्या आठवड्यात मी सोसायटीच्या एका कार्यक्रमात वाचलेल्या स्वलिखित निबंधाचा परिणाम होता.आमच्या सोसायटीच्या वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रम होता.

तेव्हापासून सोसायटीत आणि आजूबाजूच्या परिसरात माझा लेखक म्हणून परिचय झाला होता.

चौघेही दिवाणखान्यातील सोफ्यावर स्थानापन्न (त्यांचाच शब्द) झाले.

दोन मुलांपैकी एकजण पायातले बूट न काढताच स्थानापन्न झाला होता. दुसरा साधारणतः शंभर किलो वजनी गटात बसेल असा होता. मुलींपैकी एकजण टीव्हीवर बातम्या देतात त्यावेळी चेहऱ्यावर भाव असतात तशी भाव घेऊन आली होती. तिने समोरील भिंतीतून आरपार बघत नजर रोखली होती. दुसरी मुलगी हातात मोबाईलपेक्षा मोठ्या आकाराचे यंत्र घेऊन त्यावर काहीतरी टाईप करत होती. त्याला 'टॅब' म्हणतात हे मला नंतर कळालं.

मी (आवाजात शक्य तितका कोरडेपणा आणत) :-"विचारा, काय विचारायचं आहे तुम्हाला?"

टॅबवाली तरुणी :- "आम्ही महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या प्रांताचे प्रतिनिधित्व (उच्चारी "पती- निधित्व") करणारे तरुण आहोत."

मी :– " हो, ते कळलं."

टॅब वाली तरुणी :- "आम्हाला नववर्षाविषयी आणि तरुणाईविषयी तुमच्या प्रतिक्रिया समजून घ्यायच्या आहेत."

मी -“ हो, ते सुद्धा कळलं.”

टॅब वा. त. :–“सगळं कळतं तुम्हाला, पण तरुणांच्या मनातील वेदना कळाल्या का तुम्हाला?”

मी (अपराधी स्वरात):-“ नाही बुवा.”

शंभर किलो गट तरुण :–“आणि तुम्हाला त्या वेदना समजून घ्याव्यात असं सुद्धा कधी वाटलं नाही.”

टॅ.वा.त. :–“जाऊ दे रे, त्यांना आपल्या वेदना नाही कळणार!”

शं. कि. गट तरुण :– “तुमच्या लिखाणातून सुद्धा कधीच आमच्या वेदना प्रतिबिंबित (उच्चारी‘पती-बिंबित’) झाल्या नाहीत.”

मी (अपराधी स्वरात) :– “मला गुन्हा मान्य आहे. इथून पुढे माझे लिखाण वाचताना वाचकाला वेदना होतील याची मी काळजी घेईन.” (“म्हणजे अगदी बारीक अक्षरात पुस्तकात छापायचे का? म्हणजे वाचताना डोळ्यांना वेदना होतील?” हा माझा मनातील प्रश्न गिळून टाकला)

टॅ.वा. त. :– “बरं आता मूळ मुद्याकडे वळूयात” (“वळा”- मी मनातल्या मनात)

यानंतर बुटवाल्या तरुणाने बोलंदाजी सुरुवात केली.

बुटवाला तरुण :- “या नवीन वर्षाकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत?”

मी - “काहीच नाहीत.”

बु.वा. त. - “असं कसं? काहीतरी असणारच ना!”

मी - “अगदीच अपेक्षा नाहीत असं नाहीत. आमचे शेजारी रोज आमचा पेपर वाचायला नेतात. नवीन वर्षात त्यांनी स्वतःचा पेपर सुरु करावा अशी माझी अपेक्षा आहे. शिवाय तो बर्वे काकांचा कुत्रा माझ्याकडे नेहमी खुनशी नजरेने पाहत असतो. या वर्षात त्याची (म्हणजे कुत्र्याची) नजर प्रेमळ होईल अशी अपेक्षा आहे.”

शं. कि. ग. त.- “तुम्ही अगदी सामान्य पातळीवर तुमचे आयुष्य ढकलत आहेत असे तुम्हाला वाटत नाही का? इतक्या फालतू अपेक्षा बाळगून तुम्ही या नववर्षाचे स्वागत कसे करू शकता?”

मी – “पण मी कुठे या वर्षाचे स्वागत करायला गेलो होतो. ते स्वतःहुन आले आहे.”

शं. कि. ग. त. - (हताश स्वरात) “ पण लेखक वर्गाचा प्रतिनिधी (उच्चारी ‘पती-निधी’, " अरे यार, काय प्रॉब्लेम आहे सगळ्यांचा "- मी मनात) म्हणून तुम्हाला या वर्षाकडून काही

मंगल, दिव्य, भारावून जाणारे असे काही काही अपेक्षित नाही का?”

मी - (अत्यंत भाबडेपणाने) - “म्हणजे नक्की कसं? “

इतका वेळ शांत असलेली आणि भिंतीतून आरपार पाहणारी तरुणी म्हणाली, “आपल्याला एक खासगी प्रश्न विचारायचा आहे. विचारू का? ”

तिचा आवाज स्वयंपाकघरात ऐकू गेला असावा कारण आतून एक भांडे विनाकारण जोरात वाजले.

मी (घाम पुसत) :- “ विचारा की?”

बातम्या देणारी तरुणी :– “एकविसावे शतक एकविसाव्या वर्षात पदार्पण करत असताना तुम्हाला पुन्हा एकदा तरुण झाल्यासारखं वाटत नाही का?”

स्वयंपाकघरातून सगळ्याच भांड्यांची आदळआपट ऐकू आली आणि माझे उत्तर त्यात विरून गेले.

टॅ.वा. त. – “ तुमच्याकडे येण्याआधी आम्ही प्रविंकडे गेलो होतो. ते म्हणाले - या वर्षाच्या सुरुवातीला मला कोकणातल्या माडांच्या झावळ्यांतून संगीत ऐकू येत आहे. त्यानंतर आम्ही व्यंचिंकडे गेलो तेव्हा ते आम्हाला शुभेच्छा देताना म्हणाले – ‘ तुम्हा तरुण लेखकांची लेखणीरुपी बासरी या वर्षात मधुर स्वरांनी

लोकांना चिंब करेल ‘. व्यंचिंनी आम्हाला तुमच्याकडे पाठवले म्हणून आम्ही तुमच्याकडे आलो.

(सगळा घोळ आत्ता माझ्या ध्यानात आला. तो व्यंचिं एकदा भेटू दे साहित्य संमेलनात... बघून घेतो त्याच्याकडे... ‘ग्रामीण वळू आणि वाळू’ या परिसंवादाचा त्याला अध्यक्षच करतो….. असा विचार मनात पक्का केला)

मी – “अरे हो हो... व्यंचिं आणि मी म्हणजे परममित्र. परवाच भेटले होते मला... त्यांच्या ‘हिमालयाची उचलबांगडी’ या कवितासंग्रहाच्या प्रकाशनसोहळ्यामध्ये!... बरं..तुम्हाला नवीन वर्षाच्या प्रतिक्रिया आणि शुभेच्छा पाहिजेत ना?”

बु.वा. त. – “ हो सर! “

मी – “ मग घ्या तर लिहून …!!!!! या वर्षात प्रवेश करताना मला पुन्हा एकदा तरुण झाल्यासारखे वाटत आहे... या वर्षात माझे सारे ज्वलंत वाङ्मय सूर्याच्या साक्षीने मी जगापुढे आणणार आहे. याच वर्षात मी ' वखारीतील कोळसा ' हा धगधगणाऱ्या कवितांचा संग्रह लिहणार आहे असा संकल्प मी आज तुमच्या साक्षीने सोडत आहे …… पुरे का? “

शं. कि. ग. त. (घाम पुसत)- मस्तच.

टॅ.वा. त. – “ आणि आम्हा तरुणांना या वर्षाच्या शुभेच्छा?“

मी – “ अरे हो, ते राहिलेच... घ्या लिहून! तरुणांचे प्रतिनिधी (उच्चारी ' पती ' निधी) म्हणून तुमच्याकडे पाहताना मला खूप अभिमान वाटतो. या वर्षात बालहनुमंतासारखी तुमची लेखणी सूर्यमंडळावर झेप घेवो ही माझी तुम्हाला शुभेच्छा! तुमच्या लिखाणात चंद्राच्या शीतलतेचे प्रतिबिंब (उच्चारी ' पती' बिंब) नक्की पडणार यात माझ्या मनात संदेह नाही.”

चौघे जण (एका स्वरात)- “ खूप छान सर!”

बातम्या देणारी तरुणी - “ सर, अजून काही स्फुरतय का तुम्हाला?”

मी (घाम पुसत)- “बास एवढं या वर्षासाठी. उरलेले नंतर कधीतरी बोलेन.”

चौघे जण (एका स्वरात)- “ ओके सर, नो प्रॉब्लेम! आम्ही निघतो.”

जाताना तो बुटवाला तरुण न विसरता पायपुसण्याला बूट पुसून गेला.

आता मला गरज होती ती झोपेची; कारण, मला खरंच शिणवटा आला होता.

* * * * * * * * * * * * * * * * *

*“हा मनुष्य भेटल्याभेटल्या पहिल्यांदा शेकहॅण्ड करतो... आणि हाताला एवढ्या जोराने हिसके देतो की एखाद्या दिवशी हात निखळून पडेल की, काय अशी भीती वाटते.”*

*(एक नवीन शत्रुपक्ष.)*



## ७.एक नवीन शत्रुपक्ष

फुटपाथवरून तो माझ्या दिशेने येताना दिसला आणि मी फुटपाथ बदलण्याचा विचार केला... पण आता उशीर झाला होता... त्याने मला हाक मारलीच... मी ऐकू आलं नाही असं दाखवलं पण माझ्या शेजारून जाणाऱ्या एका सज्जन गृहस्थाने माझ्या शर्टाला ओढत – "तुम्हाला कोणीतरी बोलावतंय" असं सांगितले... त्या सज्जन गृहस्थाला मी वरवर ' थँक्यू ' म्हणलं खरं... पण एवढं केविलवाणं 'थँक्यू' मी आयुष्यात प्रथमच म्हणलं होतं.

त्याने पुन्हा हात वर करून मला मोठ्याने हाक मारली. आता मला सुद्धा त्याला हात दाखविण्याशिवाय पर्याय नव्हता.

पळत पळत तो माझ्या जवळ आला आणि माझा हात त्याच्या हातात घेत म्हणाला, "अरे, किती वेळ हाक मारतोय तुला... धांदरटासारखा कुठे बघत होतास? "

मला त्याच्या या दोन्ही सवयी आवडत नाहीत. एक म्हणजे भेटल्या भेटल्या तो माझा हात त्याच्या हातात घेऊन गदागदा हलवत मोठ्याने विनाकारण हसतो... !

खरं तर शंकऱ्याने मला तंबी दिली आहे, " फादर रस्त्यात कोणीही भेटलं तर विनाकारण शेकहॅण्ड करायचं नाही. त्याच्या हातावर असलेले जंतू आपल्या हातावर येतात. "

अलीकडे मी बाहेरून घरी आल्याआल्या शंकर कुठल्यातरी बाटलीतले औषध तळहातावर टाकतो आणि हात चोळायला सांगतो. पहिल्या वेळेला मला तर वाटले होते की तीर्थच आहे पण शरयूने चटकन सांगितले म्हणून वाचलो.

पण हा मनुष्य भेटल्याभेटल्या पहिल्यांदा शेकहॅण्ड करतो... आणि हाताला तर एवढ्या जोराने हिसके देतो की, एखाद्या दिवशी हात निखळून पडेल कि काय अशी भीती वाटते... ! त्यावर कडी म्हणजे त्याचं ते अचकटविचकट हसणं!

आणि डोक्याला त्रास देणारी त्याची दुसरी सवय म्हणजे मला 'अरे -जारे' करत एकेरीत हाक मारणे...

इथं मी एक गोष्ट स्पष्ट करतो... मला एकेरीत हाक मारण्याचा हक्क फक्त झुकरबर्ग किंवा बिल गेट्स यांनाच आहे, असं माझं अजिबात म्हणणं नाही... पण आपली फारशी ओळख नसलेल्या माणसाला कशाला एकेरीत हाक मारायची?... असं शाब्दिक अंगचटीला येणे मला अजिबात आवडत नाही.

खरं तर मीदेखील त्याच्याविषयी माघारी बोलताना त्याला एकेरीतच बोलतो……..पण पाठ फिरली की आजकाल कोण आदराने बोलतो दुसऱ्याविषयी!!... फार ओळख नसेल तर निदान तोंडावर तरी 'अहोजाहो ' करावे या संस्कारात वाढलेला मी!... असो.

याची आणि माझी फार ओळखही नाही. कुठल्यातरी व्हाट्सअँप ग्रुपवर आम्ही दोघे मेम्बर आहोत. एकदोनदा त्याच्या ' गुड मॉर्निंग' च्या मेसेजला मी गाफीलपणे अंगठे टाकले होते, तेव्हा त्याने पर्सनल मेसेज टाकून सलगी वाढवली होती. त्यानंतर असाच एकदा हा गृहस्थ रस्त्यात अचानकपणे पुढे येऊन उभा राहिला आणि" तुमच्या डीपीच्या फोटोवरून तुम्हाला ओळखले " असे सांगून त्याने मला आश्चर्याचा धक्का दिला होता.

खरं तर, शंकरने माझ्या आधारकार्डाचा मोबाईलवरून फोटो काढून तो माझा व्हाट्सअँप डीपी ठेवला होता... त्यावरून मला प्रत्यक्षात ओळखणाऱ्या या गृहस्थाला ‘तिसरा डोळा’ असावा असे मनोमन वाटून मला त्याचे माफक कौतुकही वाटले होते.

पण त्यानंतर हा इसम त्रासदायक ठरायला लागला होता.

घाईगडबडीच्या वेळी हा मला गाठतो आणि त्याच्या सोशल मीडियाचे किस्से ऐकवतो.

“अरे, लक्ष कुठे आहे तुझं?” त्याने मला भानावर आणत पुन्हा एकदा गडगडाटी हास्य केलं

“काही नाही... काही नाही... काय म्हणत होता तुम्ही” मी पुटपुटलो.

" अरे, लक्ष कुठे आहे तुझं, चल ब्रेकफास्ट करूयात " त्याने मला ओढतओढत शेजारच्या टपरीकडे नेले. मी माझा खिसा चाचपला... कारण कमीतकमी शंभर- दोनशे रुपयांना तरी फटका बसणार होता मला!

टपरीत शिरता शिरता गल्ल्यावर बसलेल्या अण्णांना मी नेहमीप्रमाणे दोन्ही हात जोडून नमस्कार केला... अण्णा कानात नळ्या घालून मोबाईलवरील गाणे ऐकण्यात दंग झाले होते... माझ्यासाठी हे नवीनच होतं. अण्णांचा मुलगा कानात त्या नळकांड्या घालून बसलेला अनेकदा बघितला होता पण अण्णांना या अवस्थेत प्रथमच पाहत होतो... ! कानातील त्या नळ्यांमुळे टपरीवरील गिऱ्हाइकांबरोबर त्यांचा संवाद आता हातवाऱ्यानीच सुरु होता.

टपरीतली त्यातल्या-त्यात स्वच्छ खुर्ची हुडकून मी टेकलो... पलीकडची खुर्ची ओढत तो त्यावर दाणकन आदळला.

" बोला" मी शक्य तितक्या कोरड्या स्वरात सुरुवात केली.

" अरे, बोला काय! तो रेग्या कसा लायनीत आला - हे कळलं का तुला? "

"नाही बुवा " मी

"अरे, मला एफबीची रिक्वेस्ट पाठवली त्याने गेल्या आठवड्यात " त्याने टाळीसाठी हात पुढे करत म्हणलं.

" कसली रिक्वेस्ट? " मी माझा हात मागं घेत विचारलं.

" एफबीची!! - तो

" एफबीची?? " मी

" हो हो.. एफबीची" तो चेकाळत म्हणाला.

" अच्छा.. अच्छा... एफबीची!!! " मी माघार घेत म्हणलं

" अरे हो! एफबीची रिक्वेस्ट आली त्याची" त्याने जवळजवळ उडीच मारत म्हणलं. " म्हणलं, अब आया उंट पहाड के नीचे. "

एफबीची रिक्वेस्ट म्हणजे काय आणि त्याचा त्या पहाडवाल्या उंटाशी काय संबंध? मला काही कळलं नव्हतं... पण माझ्या गेल्या चाळीस पिढ्या एफबी का काय ते त्यात लीलया वावरत असल्यासारखे आव आणत मी म्हणलं, " काय सांगता! "

" अरे हो! "

" कमालच झाली, ………. एफबीची रिक्वेस्ट आणि ती सुद्धा तुम्हाला आणि ती सुद्धा त्या रेग्याने!! " - दोन तीन शब्दांच्या भांडवलावर मी खिंड लढवत होतो.

" अरे हो" - तो

तो काही ' अरे हो ' च्या पलीकडे सरकायला तयार नव्हता.

" जरा डिटेल सांगता का? " मी माझ्या चेहऱ्यावर उत्सुकता थापत म्हणलं.

" सांगतो... सांगतो! " त्याने त्याच्या हातातील त्याची मंडईने भरलेली पिशवी माझ्या मांडीवर आदळली.

" हे काय आहे? " मी पिशवीकडे पहात म्हणालो.

" अरे काही नाही... मंडईतून कांदे-बटाटे आणि भाजी घेतली ना आत्ता... खाली नको ठेवूस... आजकाल व्हायरस कुठे असतील सांगता येत नाही " ती पिशवी माझ्या मांडीवर ठेवण्याचे कारण त्याने सांगितले.

मी देखील तो दहा पंधरा किलोचा ऐवज मांडीवर सांभाळत ' आलिया भोगासी' या विचाराने त्याच्या उत्सकुतेत माझी उत्सुकता मिसळत त्याचे पुढील बोलणे ऐकायला लागलो.

" गेल्या महिन्यातली गोष्ट आहे... तो रेग्या मॉर्निंग वॉकला भेटायचा... तिथे आसने करताना माझ्या ढेरीवरून कॉमेंट्स करत

होता... त्यावेळी मी त्याला फक्त एकच वाक्य म्हणलं होतं - देशस्थांच्या ढेऱ्या पुढे येतात कारण ते पोटभर जेवतात... कोकणस्थांसारखी त्यांचं पोट खपाटीला नाही जात!... माझ्या या एका वाक्याने तो रेग्या लालबुंद झाला आणि माझ्याशी बोलायचा बंद झाला. "

खरं तर तो रेगे बोलला ते काही खोटं नव्हतं. आता सुद्धा खुर्चीत बसल्यावर याची ढेरी नजरेत भरण्यासारखी होती.

पण मला त्याच्याशी काही देणेघेणे नव्हते.

मी अण्णांच्या पोऱ्याला दोन प्लेट वडा आणि दोन चहा सांगितला. पुढ्यात आलेल्या वड्याचा तुकडा तोडत मी विचार करत होतो की तो हे सगळं मला का सांगत होता!!!

त्याची मधली काही वाक्ये मी ऐकलीच नाहीत.

मी भानावर आलो तर त्याचे पुराण सुरूच होतं- - " मी पण म्हणलं - नाही बोललास तर गेलास उडत!... गेल्या आठवड्यात त्याची एफबीवर रिक्वेस्ट आली तेव्हा मनात म्हणलं - बच्चमजी आता कसा लायनीत आलास."

" पण मघाशी तुम्ही ते उंटाचं काहीतरी म्हणत होता" मी भाबडेपणाने विचारले.

" तेच सांगतोय ना - अब कैसे आय उंट पहाड के नीचे! माझ्याशी बोलत नव्हता... पण त्याला कुठं माहित होतं की माझे एफबीवर चार हजार फ्रेंड्स आहेत... शेवटी आला नाक घासत... आणि पाठवली त्यानं मला फ्रेंड रिक्वेस्ट" त्याचा उर अभिमानाने भरून आला होता.

एवढे फ्रेंड्स असलेला माणूस इथे टपरीवर माझा आणि स्वतःचा वेळ वाया घालवत का बसला आहे हे कोडे मला उलगडत नव्हतं.

त्याची वड्याची प्लेट त्याच्या हातात देत मी त्याला खुणेनेच " थोडं खाऊन घ्या " अशी खुण केली.

"तुला तर माहीतच आहे, मी कधी बाहेरचं काही खात नाही आणि अरबट-चरबट तर अजिबातच खात नाही " तो आख्खा वडा तोंडात कोंबत म्हणाला. त्याचं पुढचं बोलणं मला त्याच्या तोंडातील वड्यामुळे नीट कळलं नाही.

मग त्याने त्याच्या मोबाईलवर त्याचे फेसबुक ' उघडून ' दाखवले.

त्यातील सगळ्या पोस्ट तो मला मोठ्या चवीने दाखवत होता.

मी त्याला डिस्टर्ब् करत म्हणलं, " चहा घ्या ना "

" अरे हो..राहिलाच ना" असं म्हणत त्याने एका घोटात आख्खा कप चहा गिळून टाकला आणि एरंडेल पिल्यासारखा चेहरा करत म्हणाला, " कडवट लागतोय ना चहा"

मी गल्ल्यावरील अण्णांकडे हळूच पहिले. त्यांच्या कानात अजूनही ती नळकांडी होती. त्यांनी त्या गाण्याच्या चालीवर गल्ल्यावरील टेबलावर ठेका धरला होता.मी मान वळवून पुन्हा फेसबुकमध्ये डोकं घातलं.

" आता ही बघ मजा.." त्याने मोबाईलवरून बोट फिरवत दाखवायला सुरुवात केली,... " हे बघ आम्ही गेल्या वर्षी कास पठारावर फिरायला गेलो होतो त्यावेळची पोष्ट "

" बघू... बघू " मी त्याच्या दसपट उत्साहाचे अवसान आणत खुर्चीतून पुढे सरकलो.

" अरे पावसाळयात तिथे फुलं येतात ना दरवर्षी ती बघायला गेलो होतो... पण टू बी ऑनेस्ट विथ यु... मला नाही आवडली ती फुलं!... पण माझा फोटो बघ कसा आलाय " त्याने एफबीवरचा एक फोटो बोटांनी मोठा करत दाखवला.

त्या फोटोत त्या कास पठारावील रंगीबेरंगी फुलांच्या ढिगामागे ढेरी लपवत बसलेला हा दिसत होता.

" व्वा... मस्तच आलाय " मी आवाजात कुजकेपणा आणत म्हणलं.

" अरे मस्त म्हणजे... लाईक्स बघ किती आलेत! " तो चेकाळत म्हणाला.

" किती आलेत बघू " मला मुळात लाईक म्हणजे काय ते समजलं नव्हतं... आणि समजून घ्यायची इच्छा सुद्धा नव्हती. तरी सुद्धा त्याने लाईक बटन म्हणजे काय, ते कसे क्लिक करायचे, मग 'लायकीची' संख्या कशी एकने वाढते हे सगळे मला शिकवले. एक तर या महाभागाने माझी सगळी सकाळ खराब केली होती. त्यात त्याची दहा -पंधरा किलो भाज्या भरलेली पिशवी गेला अर्धा-पाऊण तास मांडीत ठेवून माझ्या पायाला रग लागली होती आणि याचे एफबी पुराण थांबायची काही चिन्हे दिसत नव्हती.

या सगळयामुळे माझ्या सहनशक्तीचा अंत झाला होता.

शेवटी मी वेळ साधून तोंड उघडले आणि म्हणालो, " फेसबुक वर खरं तर 'लाईक' सारखं 'ना-लायक' सुद्धा बटन पाहिजे ना! तसं असतं तर ते बटन मी या फोटोला क्लिक केलं असतं "

मी किमान शब्दात त्याचा कमाल अपमान केला होता.

त्यानंतर अनेक दिवस तो ' एक अत्यंत फालतू मनुष्य ' या शब्दात माझी बदनामी करत हिंडत होता -असे माझ्या कानावर आले.

सध्या मी माझे फेसबुक अकाउंट सुरु करून त्याला पहिली एफबी फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून आमच्यातील वादावर पडदा टाकायच्या विचारात आहे.

* * * * * * * * * * * * * * * * * * *

*“पहिला तास नुसतं स्माईल करण्यात आणि न्यू इअरच्या शुभेच्छा देण्यात गेला.”*

*(न्यू ईअरची पार्टी!)*



## ८. न्यू ईअरची पार्टी!

३१ डिसेंबरच्या पार्टीला आयुष्यात कधी जाईन असं वाटलं नव्हतं. पण मंगळदास शेठच्या कृपेने आमचं बिऱ्हाड चाळीतल्या खोल्यातून सोसायटीच्या तीन खोल्यांच्या ब्लॉकमध्ये आलं आणि हा हा म्हणता आमची प्रगती झाली. मी धोतरातून सुटात आलो. शंकऱ्या पांढरा शुभ्र सदरा घालू लागला, शरयूला नवीन स्कर्ट (कर्ट्स) मिळाला. आणि आमच्या हिने तर ब्लाऊजला मॅचिंग, खुर्चीला मॅचिंग, टेबलाला मॅचिंग असली प्रकरणे सुरु केली होती. ("आमच्या क्लबातल्या बायका कौतुकाने म्हणत होत्या - नवरा सोडून तुम्ही सगळं मॅचिंग केलं आहे" - इति आमची ही).

एक तर मी ३१ डिसेंबरच्या पार्ट्याना जाण्याचं कायम टाळतो. कसलं ते ढॅणढॅण संगीत आणि गाणं! त्यापेक्षा आमचे बाबा डोक्यावर तेल थापत नाट्यसंगीत म्हणत बसायचे ते बरं वाटायचं. पण काय करणार.शंकऱ्याचे मित्रमंडळ आग्रह करायला आले होते.सगळे म्हणाले "अंकल, तुम्ही यायलाच पाहिजे"........ त्यामुळे माझा नाईलाज झाला. मनाचा हिय्या करून गेलो. आमच्या मिसेसच्या आग्रहाखातर (ब्लॉकमध्ये रहायला

आल्यापासून ती ‘मिसेस’ झाली आहे) मी हिच्या आवडीचा रंगीबिरंगी शर्ट आणि चट्ट्यापट्ट्याची विजार घातली होती. (त्यावेळी मला आमच्या ब्रह्मचारी काकाचे “बेंबट्या, बायकोच पाणी पाजणार हो तुला” हे शब्द कानात घुमत होते.)

पार्टी आमच्या सोसायटीच्या गच्चीत होती. स्वागताला नानू सरंजामे चौकड्याचा तांबडा शर्ट घालून उभा होता …आम्हाला पाहताच म्हणाला “वेलकम वेलकम, यु ऑल आर लुकिंग सो ब्युटीफुल”(“कसलं फुल?” नेहमीप्रमाणे मी मनातल्या मनात प्रश्न विचारला). पलीकडे एका खुर्चीवर बसून दुसऱ्या खुर्चीवर तंगड्या पसरून जणू काय ही गच्ची आपल्या तीर्थरुपांचीच आहे अशा आविर्भावात आप्पा भिंगारड्या मोबाईलवर मेसेज बघत बसला होता. सोसायटी मधील सर्व लोक पार्टीला हजर होते. पहिला तास नुसता एकमेकांकडे बघून स्माईल करण्यात आणि न्यू इअरच्या शुभेच्छा देण्यात गेला … मला एक कळत नाही हे लोक विनाकारण वेळ कशाला वाया घालवतात … रात्रीचे नऊ वाजायला आले होते. मी न राहून नानूला विचारले, “खायला-गिळायला काय आहे?”….. माझ्या या प्रश्नावर माझ्याकडे अतिशय तुच्छ नजरेने बघत नानू म्हणाला, “मला गिळायचं आहे ब्रह्माण्ड” …… मी सरळ आप्पा भिंगारड्याकडे गेलो आणि कानात विचारले, “जेवायचं कधी रे?”…….. माझ्याकडे दुर्लक्ष

करत मोबाईलवरून न्यू ईअरचा मेसेज कुणालातरी फॉर्वर्ड करत करत आप्पा म्हणाला, “मी मगाशीच जेवून घेतलं. मटारमध्ये काही दम नाही. राईस अगदीच चिखल झालाय. स्वीट तेवढं बरं झालंय.मी पाच वाट्या चापलं. चल, तुला कंपनी देतो.” … असं म्हणून आप्पा मला ओढत जेवणाच्या टेबलाकडे घेऊन गेला. खरं तर मला पण केव्हाची भूक लागली होती. पण अजून कुणीही जेवणाचं नाव काढत नव्हतं त्यामुळे थोडं लाजल्यासारखं होत होतं. आप्पा मात्र स्वतःच आचारी असल्याच्या आवेशात पुढे गेला आणि त्याने दोन डिश भरून आणल्या. आम्ही दोघे उभ्याउभ्याच पोटात घास ढकलू लागलो. नेमकं हे आमच्या हिने पाहिलं आणि तरातरा माझ्याकडे येऊन म्हणाली “अहो आता आपण काही पूर्वीसारखे ब्याकवर्ड राहिलो नाही. आजूबाजूला सगळे फॉरवर्ड लोक आहेत (उच्चारी दोन्ही "ड" स्पष्ट!) ठेवा ती डिश खाली आणि चला ऐकायला संगीत रजनी…..”

मी आशेने आप्पाकडे पाहिले. त्याच्या तोंडात घास असल्याने त्याने नुसतं खुणेने ‘तू हो पुढे’ असं म्हणलं आणि मी जेवण अर्धवट सोडून संगीत रजनी पाहायला आलो …मी मनात विचार करत होतो की, भूक लागल्यानंतर जेवण्यात कसला आलाय ब्याकवर्डपणा! …पण तो विचार झटकून संगीतरजनी पहायला लागलो. सोसायटीतील पोरांनी गाणी म्हणली, जोक्स

सांगितले. आमच्या शंकऱ्याने सुद्धा ‘हाय दिल तोड दिया..’ असलं काहीतरी गाणं म्हणलं. आमच्या हिने तिच्या क्लबातल्या बायकांसोबत कुठलंतरी समूहगान म्हणलं. एकसारख्या रंगाच्या साड्या नेसून आलेल्या त्या सगळयाजणी चेहऱ्याच्या आणि मानेच्या एकसारख्या हालचाली करत कुठली तरी गाणं म्हणत होत्या … ते गाणं फ्रेंच भाषेत होतं ही माहिती शंकऱ्याने मला पुरवली. कार्यक्रमाच्या शेवटी ‘सोसायटी गंधर्व’ एच. मंगेशराव आणि त्यांच्या सुविद्य पत्नी यांनी भैरवी म्हणायला घेतली... आजूबाजूला थंडी होती … पोटात दोन घास गेले होते... खुर्चीत बसल्या बसल्या मला झोप लागली … स्वप्नात मी उभ्या उभ्या जेवत आहे आणि माझ्याकडे बघत सगळे हसत आहेत असं काहीतरी आलं … एवढ्यात कोणीतरी धक्के मारतंय असं वाटलं... डोळे चोळत उठलो तर सोसायटीचा वॉचमन मला झोपेतून उठवत म्हणाला “साब, इधर क्यू सोयेला है... सब लोग चले गये... देखो बारा बज गये.. ह्यॅपी न्यू ईअरचा टायम हो गया”… मी मनगटावरील घड्याळात बघितले... बरोबर बारा वाजले होते.‘काळ कितीही पुढं गेला तरी बाबांनी दिलेलं हे घड्याळ मात्र बरोब्बर वेळ दाखवतं’- असं पुटपुटत मी पाय ओढत घराकडे निघालो.

* * * * * * * * * * * * * * * * * * * *



“पुन्हा एकदा... पुल आपल्या भेटीला...”

या पुस्तकाच्या इतर भागांसाठी संपर्क साधा.

डॉ वीरेंद्र वसंत ताटके

पत्ता - ए - १०५, वनाज परिवार सोसायटी,

कोथरूड, पुणे, ४११०३८

मोबाईल क्रमांक - ९२२५५११६७४

मेल आयडी – tatakevv@yahoo.com

अशाच हजारो पुस्तकांसाठी भेट द्या

www.esahity.com